दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के
बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के
बीड | मंगळवार,दि.६ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# राज्यात उभे राहणार ‘मधूपर्यटन’

१० गावांची ‘मधाची गावे’ म्हणून होणार ओळख

बीडमधले एखादेही गाव योजनेत नाही?

५ कोटी, १ लाख ९७ हजार रुपये खर्चाचे अंदाजपत्रक

कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशचा समावेश

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महाराष्ट्रातील विविध १० जिल्ह्यांतील १० गावांमध्ये ‘मधाचे गाव’ ही योजना राबविण्याचा निर्णय राज्याच्या उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ३० एप्रिल २०२५ रोजी घेतला आहे. दरम्यान या योजनेत बीड जिल्ह्याचा समावेश घेतला जावा अशी मागणी होत आहे. सदर योजनेद्वारे राज्यात नैसर्गिक साधन संपत्ती लाभलेल्या विविध भागांमध्ये मधमाशांच्या संवर्धनातून तसेच मध आणि मधमाशांपासून तयार होणारी उत्पादनाची साखळी, प्रक्रिया व विक्री व्यवस्था करण्यात येईल.या माध्यमातून राज्यात एक प्रकारे मधूपर्यटन होणार आहे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने या योजनेसाठी राज्यातील दहा गावांच्या नावांचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला होता. या योजनेसाठी राज्य शासनाने ५ कोटी, १ लाख ९७ हजार रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. ज्या गावामध्ये ही योजना यावर्षी राबविण्यात येणार आहे, त्याच गावात सदर योजना पुढच्या वर्षीही राबविण्यात येईल, असे हमीपत्र शासनाकडे सादर करणे हे संबंधित ग्रामपंचायतीला आवश्यक असेल.योजनेत समाविष्ट गावाच्या नावांची यादी बघून हे लक्षात येते की, गावांची निवड करताना संपूर्णपणे प्रादेशिक समतोल राखण्यात आला आहे. महाराष्ट्रातील कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि खान्देश अशा पाचही भागांतील गावे या यादीमध्ये आहेत. खेडेगावांमध्ये ही योजना राबविण्यात येणार असल्यामुळे ग्रामीण भाग हे व्यापाराचे केंद्र होण्यास तसेच ग्रामीण भागातील रोजगार वाढीस फार मोठी मदत मिळणार आहे.



### शासनाचा आरोग्यदायी निर्णय

शासनाचा निर्णय अत्यंत योग्य असा आहे. ज्या भागात दाट जंगल आहे, अशा भागात मधाची गावे शासनाने निवडली आहेत. मध हा आयुर्वेदात अत्यंत उपयुक्त असून, मधाचे अनेक फायदे आहेत. तसेच मध नैसर्गिक गोड पदार्थ असून, ज्यामध्ये अनेक पोषक तत्वे आहेत. मधामध्ये अँटीऑक्सिडंटस आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असून, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवते. दिवसेंदिवस वातावरणात बदल होऊ लागला आहे.

### योजना राबविणारी गावे

‘मधाचे गाव’ ही योजना घोलवड (ता. डहाणू, जि. पालघर), भंडारवाडी (ता. किनवट, जि. नांदेड), बोरझर (ता. नवापूर, जि. नंदुरबार), काकडथाबा (ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली), चाकोरे (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक), उडदावणे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर), शेलमोहा (ता. गंगाखेड, जि. परभणी), सिंधीविहीर (ता. कारंजा, जि. वर्धा), सानोशी (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) आणि आमझरी (ता. अमरावती, जि. अमरावती) या दहा गावांमध्ये राबविण्यात येणार आहे.

# भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढला

देशविदेश:तुर्कीची युद्धनौका कराचीत दाखल




पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगलाच तणाव वाढला आहे. याच दरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे तुर्कीचे नौदल जहाज टीसीजी बुयुकाडा रविवारी कराची बंदरामध्ये दाखल झाले आहे, तुर्की नौदलाचे जहाज सद्भावना म्हणून काराचीमध्ये आल्याचे स्पष्टीकरण यावर पाकिस्तानच्या वतीने देण्यात आले आहे. मात्र पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या मुसक्या चांगल्याच आवळल्या आहेत, त्यामुळे दोन्ही देशांमध्ये प्रचंड तणावाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर या घटनेकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले जात आहे.

सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत माहिती देताना पाकिस्तानच्या संरक्षण विभागाकडून सांगण्यात आले की, तुर्कीचे नौदल जहाज टीसीजी बुयुकादा कराची बंदर पान २ वर

### पाकिस्तानचा जळफळाट

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानवर मोठी कारवाई केली आहे. सिंधू नदीच्या पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली आहे. आयात-निर्यात बंद करण्यात आली आहे. एवढंच नाही तर पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत, त्यांना देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारताच्या या कारवाईमुळे पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला असून, त्यांच्या नेत्यांकडून सातत्याने युद्धाच्या पोकळ धमक्या दिल्या जात आहेत.

# पर्यटकांमध्ये सामिल होऊन दहशतवाद्यांनी केला हल्ला!

अलर्ट:एनआयएकडून धागेदोरे शोधण्याचे काम



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाचे वातावरण आहे. या हल्ल्याचे धागेदोरे शोधण्याचे काम एनआयएकडून सुरू आहे. त्यासाठी कसून तपास केला जात आहे. या तपासातून काही धक्कादायक बाबी समोर आल्या असून, पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या ४ दहशतवाद्यांपैकी २ दहशतवादी जम्मूतील कठुआ येथून भारतात आले आणि पर्यटकात मिसळले. या दहशतवाद्यांनी पर्यटकांना एका फूड कोर्टमध्ये एकत्र केले आणि तेथे चौघांनी मिळून बेछूट गोळीबार केला. यात २७ पर्यटक मारले गेले.


पहलगाम हल्ल्यातील ४ दहशतवाद्यांपैकी दोघेजण दक्षिण काश्मीरमधील होते. ते यापूर्वी अटारी सीमेवरून पाकिस्तानला गेले होते. पण ते भारतात कधी परतले, याची कोणतीही नोंद नाही. ते जम्मूतील कठुआ मार्गे भारतात परतले, असे मानले जाते. दहशतवादी पहलगाममध्ये आले आणि पर्यटकांमध्ये मिसळले आणि त्यांना फूड कोर्टमध्ये गोळा केले. यानंतर इतर २ दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांच्या धर्माबद्दल विचारले आणि गोळीबार केला. गोळीबार करणारे दहशतवादी पाकिस्तानचे होते, असे सांगण्यात आले.दहशतवादी ४ ते ५ दिवसांपासून बैसरनच्या आसपास रेकी करत होते. स्थानिक लोकांच्या मदतीशिवाय हे शक्य नव्हते. वायरलेस चॅट्समधून मिळालेल्या गुप्तचर माहितीवरून पान २ वर

# भाजपवाले शिंदे-पवारांचाही पक्ष फोडणार!

चर्चेतले:संजय राऊतांनी लगावला टोला

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना, तुम्ही काँग्रेस पार्टी खाली करून टाका. काँग्रेस पार्टी जेवढी तुम्ही कमी कराल तेवढा तुमचा राजकीय फायदा आहे, असे विधान केले. या विधानावरुन उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते तसेच राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी भाजपाबरोबरच बावनकुळेंवर निशाणा साधला आहे.



चंद्रशेखर बावनकुळे असतील देवेंद्र फडणवीस असतील किंवा त्यांचे आका अमित शहा असतील यांनी त्यांचा पक्ष वाढवलाच नाही. भारतीय जनता पक्ष वाढवण्याचं काम गोपीनाथ मुंडे एकनाथराव खडसे, प्रमोद महाजन यांनी महाराष्ट्रात पक्ष वाढवला. बावनकुळे या मंडळींनी पैशाचा आणि सत्तेचा मदमस्त वापर करून इतर पक्ष फोडून आपल्या पक्षाला सूद आणली आजचा भारतीय जनता पक्ष हा ओरिजनल पक्ष नाही, असा टोला संजय राऊतांनी लगावला.

इतरांचे पक्ष फोडणे आणि आपल्यासोबत पान २ वर

### शिंदे-अजित पवारांचा पक्षही फोडणार

एवढं करून सुद्धा त्यांची भूक भागत नाही फक्त फोडा फोडा आणि फोडा! यांचे जे नेते आहेत अमित शाह, त्यांची देखील विचारधारा तीच आहे. दुस-यांचा पक्ष फोडा आणि आपलं वाढवा, असं राऊत अमित शाहांवर निशाणा साधताना म्हणाले. बावनकुळे यांच्याकडे लोक गांभीर्याने पाहत नाहीत. शिवसेना फोडा, राष्ट्रवादी काँग्रेस सोडा आता ते शिंदे यांची शिवसेना देखील फोडणार आहेत व ते अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष देखील फोडणार आहेत, असा गंभीर आरोप राऊतांनी केला.

# बीडचा पाणी प्रश्न तत्काळ सोडवा

अजित पवारांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

डॉ.योगेश क्षीरसागरांच्या मागणीची दखल





पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील गंभीर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या मागणीची गंभीर दखल घेत पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तत्काळ बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बीड शहरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून नियमित आणि वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येच्या समाधानासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांची भावना लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी हा प्रश्न पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडला. त्यानंतर पान २ वर

# इराणकडून तेल खरेदी थांबवा

देशविदेश:अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचा जगभरातील देशांना इशारा



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:अमेरिकेत सत्ता येताच जगाला धक्क्यावर धक्के देणा-या डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला आणखी एक धक्का दिला असून, जो कोणता देश इराणकडून तेल किंवा पेट्रोकेमिकल खरेदी करेल, त्याच्यावर निर्बंध लावण्याचा इशारा दिला. ट्रम्प यांच्या या निर्णयाचा सर्वाधिक फटका चीनला बसणार आहे. भारतावरही त्याचा परिणाम होणार आहे.


डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट पान २ वर

मंत्री प्रकाश आबिटकर | नियंत्रण ठेवण्यासाठी ॲपची निर्मिती

# ॲपद्वारे रुग्णालय व्यवस्थेवर नजर!

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:शासकीय यंत्रणेने योग्य नियंत्रण ठेवल्यास आपोआप हॉस्पिटल्सना चांगले काम करावे लागेल. यासाठी मोबाईल ॲपची निर्मिती करत आहोत. यामुळे पेशंट किंवा नातेवाईकांकडून ऑनलाईन आलेली तक्रार थेट आरोग्य विभागाला येईल. हॉस्पिटलची तक्रारदेखील ऑनलाइन पद्धतीने नातेवाईकाला देता येणार आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.गेल्या ५ वर्षांत महात्मा फुले जनआरोग्य योजनेसंदर्भात आणि हॉस्पिटल संदर्भात १ हजार ७ तक्रारी आल्या होत्या, असे आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले. हॉस्पिटलमधील बेडची उपलब्धता मोबाईल




ॲपद्वारे लोकांना मिळणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. यासोबतच महात्मा फुले आरोग्यदायी योजनेमध्ये काही महत्त्वाचे बदल आम्ही केले आहेत. त्याची अंमलबजावणी आता सुरू झाली आहे. पुढील एक महिन्यांमध्ये या योजनेतील आर्थिक मदतीमध्ये वाढ केली जाणार असल्याचे ते म्हणाले.

आदिवासी विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवल्याने मंत्री संजय शिरसाट यांनी टीका केली, या संदर्भात बोलताना आबिटकर यांनी लाडकी बहीण योजनेमुळे सर्वच खात्यांना निधीच्या बाबतीत कसरत करावी लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. बजेटमध्ये ज्या पद्धतीची निधीची उपलब्धता इतर विभागांना व्हायला हवी होती, ती झालेली नाही. यामुळे आमच्या सर्वांचीच थोडीशी अडचण झाली आहे. पहिल्या टप्प्यात काही धावपळ झाली, आता गाडी रुळावर येईल. लाडकी बहीणच पान २ वर

### जनआरोग्य योजनेअंतर्गत पैसे घेतल्यास कारवाई

महात्मा फुले जनआरोग्य योजनेत एकही रुपया पेशंटकडून घ्यायचा नसताना दुर्दैवाने काही हॉस्पिटल पेशंटकडून पैसे घेत असल्याचे समोर आले आहे. त्या संदर्भात काही तक्रारी आल्या होत्या. अशा तक्रारींवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कोल्हापूरमध्ये ४ हॉस्पिटलवर अशी कारवाई झाली असून राज्यातदेखील ही कारवाई सुरू होईल, असे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांना लाखांचा गंडा

गुन्हेगारी:चोरट्यांकडून अनोख्या पद्धतीने गंडा

पुण्यभूमी प्रतिनिधी

औरंगाबाद:महाराष्ट्र सीईटी सेल विद्यार्थ्यांवर लक्ष्य केंद्रित करत चोरट्यांनी अनोख्या पद्धतीने मोठा आर्थिक फटका दिला आहे. श्रेयस इंजिनिअरिंग कॉलेज सातारा आणि देवगिरी महाविद्यालय छ. संभाजीनगर परिसरातील २ आणि ३ मे रोजी सीईटी सेलची परीक्षा होती. या परीक्षेसाठी आलेल्या १८ विद्यार्थ्यांच्या दुचाकी आणि चारचाकींच्या डिक्या फोडल्या. तेवढचं नाहीतर, परीक्षेला गेलेल्या विद्यार्थ्यांच्या फोनचे सिमकार्ड, एटीएम व क्रेडिट कार्ड चोरले गेले. ही चोरी चोरट्यांनी अवघ्या तासाभरात केली असून विद्यार्थ्यांना ९ लाखांचा गंडा घातला.



फक्त सिमकार्ड व कार्ड्सच चोरले या चो-यांमध्ये एक विशेष बाब म्हणजे चोरट्यांनी मोबाईल फोडून त्यामधील सिमकार्ड, एटीएम व क्रेडिट कार्ड काढले. मोबाईल तसाच फेकून दिला. विद्यार्थी परीक्षा केंद्रात परतल्यावर त्यांना त्यांच्या फोनमधील सिम गायब असल्याचे लक्षात आले. काही विद्यार्थ्यांनी सिम बंद करून खात्यातील हालचाल तपासली असता, पैसे गायब झाल्याचे पान २ वर

## सारेच बेजबाबदार

गत काही वर्षांत देशात एक वेगळेच राजकारण तयार झाले आहे. ते चांगलेच पोसले गेले आहे. डेरेदार वृक्षात त्याचे रुपांतर झाले आहे. दरवर्षी ते फुला–फळांनी बहरून येते आणि सर्वसामान्य जनतेला त्याची कटू फळे चाखावी लागतात. राजकीय नेते कधी काय बोलतील याचा नेम नाही, बहुधा वादग्रस्त बोलण्यावरच त्यांचा भर असतो आणि आपले बोलणे अंगाशी येणार हे लक्षात आल्यानंतर आपण तसे बोललोच नाही असे सांगत हात झटकण्यात त्यांचा हातखंडा असतो. त्यांचा धादांत खोटेपणा जनतेच्या लक्षात येतो परंतु ती काहीच करू शकत नाही, कारण पाच वर्षांसाठी तिचे हात बांधले गेलेले असतात. वादग्रस्त बोलणा–या नेत्याचा पक्ष म्हणतो, हे त्यांचे वैयक्तिक मत आहे पक्षाचे नाही! कोण चांगले, कोण वाईट हा विषय वेगळा, पण एकूणच सर्वत्र असेच दिसून येते की, काहीही घडले तरी त्याला कोणीच जबाबदार राहत नाही.

कारण चांगले निर्णय घेतले जातात परंतु त्याचे कधी कौतुक होत नाही. काही चुकीचे निर्णय घेतले जातात पण चुकीला जबाबदार कोण ते कधी बघितलेच जात नाही. चुकीच्या निर्णयामुळे लाखो लोकांचे नुकसान होते पण जबाबदारी कोणाची राहत नाही. १५ वर्षांनंतर जर एखादा मोठा नेता निर्दोष असल्याचे न्यायव्यवस्था सांगत असेल तर तुरुंगात असे कितीतरी सामान्य निर्दोषही असू शकतील त्याचे काय? जो नेता १५ वर्षे तुरुंगात खितपत पडला त्याची उमेदीची १५ वर्षे निष्कारण वाया गेली त्याचे काय? नोटबंदीपासून जातनिहाय जनगणनेपर्यंत आणि ‘अग्निवीर’पासून मागे घेण्यात आलेल्या हिंदीच्या सक्तीपर्यंतचे अनेक निर्णय, अनेक घटना यांना जबाबदार कोण? कोणीच नाही! ईडीच्या ऑफिसला लागलेली आग, मंत्रालयात आग याला जबाबदार कोण? पहलगाम हल्ला असो की बँका बंद करणारी आरबीआय. कोणाचीच जबाबदारी नाही! दहशतवादी हल्ला झाल्यावर धावपळ होते पण नक्की जबाबदारी कोणाची हे कधी ठरतच नाही. कोर्टात वेळेत निर्णय दिले जात नाहीत. जबाबदार कोणीच नाही.

हजारो पाकिस्तानी, बांगलादेशी सापडतात, जबाबदार कोण? भ्रष्टाचार होतात, निवडणुकीत गैरप्रकार होतात, कोट्यवधीची रोकड सापडते, जबाबदार कोण? देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाराची कीड भारतीय अर्थव्यवस्थेला खिळखिळी करत आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. प्रचंड स्वार्थ, आर्थिक हाव, असमाधानी वृत्ती आणि मुजोरी ही या भ्रष्टाचा–यांची प्रमुख लक्षणे आहेत. ‘सरकारी काम आणि सहा महिने थांब’ अशी स्थिती आज प्रत्येक खात्याची झाली आहे. काम लवकर करून व्हायचे असेल तर तुम्हाला टेबलाखालून पाकीट द्यावेच लागेल हा जणू अलिखित नियमच बनला आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने अनेक सरकारी व्यवहार डिजिटल केले आहेत. मात्र भ्रष्टाचा–यांनी त्यातूनही विविध मार्ग काढले आहेत. यंदाच्या वर्षात राज्यात उघड झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणांच्या अहवालावरून महसूल खात्याने पोलिस खात्यालाही मागे टाकल्याचे दिसून येते.१ जानेवारी ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात २१२ प्रकरणांत सापळे रुचून ३०८ सरकारी कर्मचारी आणि अधिका–यांना अटक करण्यात आली. यात महसूल खात्याचे ५६ तर पोलिस खात्याचे ३१ कर्मचारी आणि अधिकारी आहेत. सर्वच सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. प्रत्येक सरकारी कार्यालयात ‘लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे’ अशा स्वरूपाची पाटी लावलेली असते पण या पाटीखालीच सर्वाधिक प्रमाणात लाच मागितली जाते आणि ती दिलीही जाते. परवाच ‘एक रुपयात पीक विमा योजना’ बंद करण्यात आली. लाडकी बहीण योजनेवरूनही वातावरण बरेच तापले होते. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने पुन्हा सत्तेत आलो तर लाडकी बहीण योजनेची दीड हजार रुपयांची रक्कम २१०० रुपये करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु आता त्यावरून हात झटकण्याचे प्रकार वाढल्याचे दिसून आले. मंत्री झिरवळ यांनी असे आश्वासन दिलेच नव्हते असे सांगत हात झटकले. नंतर त्यांनी माघार घेतली.

उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेची पूर्तता करण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात येईल असे आश्वासन मी दिले नाही असे सांगत अजित पवार यांनी हात झटकले. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये शेतक–यांची कर्जमाफी करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. सत्तेत आल्यानंतर पहिल्या अर्थसंकल्पात त्याविषयीची घोषणा होणे अपेक्षित होते. मात्र, राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्यामुळे कर्जमाफीसंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. विरोधकांनी यावर टीकेची झोड उठवली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, शेतक–यांची फसवणूक करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री पहलगाम हल्ल्यातील अतिरेक्यांपेक्षाही क्रूर झाले असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून महायुतीतच वादंग माजले आहे. या योजनेतील पात्र महिलांना पैसे मिळत असले तरी भविष्यात पैसा द्यायचा कुठून असा प्रश्न महायुतीच्या नेत्यांना भेडसावत आहे.लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचे पैसे देण्यासाठी सामान्य प्रशासन आणि आदिवासी विभागाचे मिळून ८०० कोटी रुपये वळवल्याने शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट संतप्त झाले. सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल तर खाते बंद केले तरी चालेल, अशा शब्दांत नाराजी व्यक्त करत शिरसाट यांनी अर्थखात्यावर टीकास्त्र सोडले. दोन कोटी लाभार्थींना दरमहा आर्थिक मदत देण्यासाठी निधी जमवताना महायुती सरकारची चांगलीच दमछाक होत आहे. आर्थिक मदत देण्यासाठी सरकारला इतर खात्यांचा निधी वळवावा लागत आहे. आदिवासी व सामाजिक न्याय विभागाचा निधी लोकसंख्येच्या आधारावर मिळतो, तो कायद्याने वळवता येत नाही. हा निधी त्या संवर्गावर खर्च करणे बंधनकारक आहे. तो इतर खात्यांमध्ये वळवता येत नाही. अर्थखात्याची मनमानी सुरू आहे. त्यांना जे वाटते तेच खरे अशा शब्दांत संजय शिरसाट यांनी अजित पवार यांच्या खात्याविषयीची नाराजी व्यक्त केली. एकूण काय हात झटकणे, जबाबदरी झटकणे हेच सुरू आहे!

# प्रसिद्धीची हौस वगैरे?



टिका अनेक कारणांनी करता येते. पण, त्याला काही काळ वेळ असावी?ती कितपत आहे किंवा असावी हा ज्याच्या त्याच्या सदसद्विवेकबुद्धीचा भाग. त्यानुसार पाहण्याचा दृष्टिकोन समोर येतो. सांगण्याचा मतलब म्हणजे २२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लूयात २६ जणांचा मृत्यू झाला तर अनेकजण जखमी झाले.हा हल्ला झाल्यानंतर अनेक प्रतिक्रिया आल्या पण, तत्काळ पर्यटकांच्या मदतीला धावून गेले ते शिवसैनिक. शिवसैनिकांनी संपर्क साधला आणि पर्यटकांच्या मदतीला धावून गेले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः शिंदे आणि शिवसैनिक जम्मू काश्मीरला महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांना आणण्यासाठी गेले.मराठी माणसाच्या समस्यांसाठी रस्त्यावर उतरणारा शिवसैनिक तितकाच सत्ताकाळात सुध्दा महाराष्ट्र मराठी माणसांसाठी धावून जातोय. हे दिसले. पहलागाम येथे अडकलेल्या पर्यटकांना धीर दिला तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी . सरकारच्या यंत्रणेशिवाय मदत करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हात सतत पुढे असतो.हे पहलगाम येथील हल्लूयानंतर लक्षात आले असेल . पर्यटकांची आस्थेवाईकपणे विचारपूस करताना दिसले. यावेळी पर्यटकांच्या चेहऱ्यावरील हावभाव आणि स्मितहास्य पाहून पर्यटकांना आपलीशी भावना चेहर्यावर दिसली. तेही दहशतवाद्यांनी हल्ला केल्यानंतर. हा क्षण पर्यटक कधी विसरू शकणार नाहीत?राज्याचा खूद्द उपमुख्यमंत्री आपली आस्थेवाईकपणे विचारपूस करतो हे म्हणजे एका कुटुंबातील सदस्यासारख ! पर्यटकांना आणण्यासाठी स्वतंत्र विमानाची व्यवस्था, महाराष्ट्राच्या भूमीवर पाय ठेवण्यापर्यंत त्यांची काळजी. हे म्हणजे सरकारी यंत्रणेच्या पलिकडे? उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सरकारचा भाग आहेत. पण, त्यापेक्षा त्यांच्यातील कनवाळूपणा पर्यटकांना दिसला असेल. सरकार स्तरावर तर मदत होईल आणि ते सरकारचा भाग आहेत.हा भाग वेगळा पण त्यापलिकडे जावून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसैनिकांची टीम तत्पर या घटनेत मदतीसाठी धावून गेल्याची दिसली. पहलगाम दहशतवादी हल्लूयात मृत्युमुखी पडलेल्या काश्मिरी तरुणाच्या कुटुंबाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५ लाख रुपयांची मदत केली आहे. शिवसेनेचे कार्यकर्ते आणि सीमा अधिकाऱ्यांनी मृतांच्या कुटुंबाची भेट घेतली आणि नुकसानभरपाई सुपूर्द केली. भेटीदरम्यान स्थानिक आमदार सय्यद रफिक शाह देखील उपस्थित होते. महाराष्ट्रातील मुख्यमंत्री जम्मू काश्मीर येथील तरुणांना कुटुंबियांना आर्थिक मदत करतो.ही बाब टिकाकारांच्या पलिकडची म्हणता येईल.

पहलगाममधील हल्ला झाल्यानंतर आपल्याला मदतीसाठी कोणी येईल .यांत भारतीय सैनिक किंवा सरकारचे प्रतिनिधी येतील ही भावना तत्काळ मनात आली नसेल काय? कोणत्याही संकटकाळात मदतीसाठी कोणीतरी पुढे येईल ही क्षणात मनात आलेली भावना आणि मदतीसाठी कोणीतरी येते ही दिलासादायक बाब पर्यटकांना निश्चिंत करणारी. मनातील भिती किंचितशी कमी होऊन एक धीटपणा नक्कीच त्यांच्या अंगी आला असेल. पक्ष कोणताही असो, संकटात तात्काळ त्यांना दिलासा देण्यासाठी कुणीतरी पुढं आलं म्हणजे हा केवळ स्वार्थ ठरतो?तर तो कुणाला स्वार्थ वाटेल यात दूमत असू शकतं. पण, कुणाचा स्वार्थ कुणाच्या साहाय्यासाठी कामी येत असेल तर मला वाटतं तो स्वार्थ कुणीही साधावा. अर्थात कुणाला काय वाटतं यावरून काही ठरत नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसैनिक जम्मू – काश्मीर





पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

येथे अडकलेल्या पर्यटकांना महाराष्ट्रात आणण्यासाठी गेले आणि विरोधकांची जीभ वळवळ करायला लागली.हे वृत्तपत्रातील बातम्यांतून गेल्या आठवड्यात दिसून आले. प्रसिद्धीची हौस वगैरे! म्हणणं निव्वळ राजकीय विरोध ठरेल? एकनाथ शिंदे यांनी जेव्हा तत्कालीन शिवसेनेतून म्हणजे ठाकरे– शिंदे असे गट नसताना शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले आणि आमदारांची फौज स्वतः सोबत घेऊन गेले, तेंव्हाच एकनाथ शिंदे कोण? हा गुगलवर सर्वाधिक शोधला जाणारा प्रश्न.हू इज शिंदे? हा जगभरातील अनेकांनी गुगलला विचारला. त्याचवेळी एकनाथ शिंदे हे नाव सातासमुद्रापार गेलं होतं.हे वेगळं सांगण्याची गरज नाही. कारण , शिवसेनेतून बाहेर पडणं तितकं सोपं नव्हतं. याची प्रचिती आ. छगन भुजबळ यांना आलेली आहे. त्यामुळे शिवसेना सोडून जाणं हे धाडस एकनाथ शिंदे यांनी केल्याने त्यांची चर्चा सामाजिक माध्यमातून आणि जगभर होणं साहजिक होतं. त्यामुळे निदान प्रसिद्धीची हौस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना होती म्हणून ते गेले हे निव्वळ हास्यास्पद. तर शिवसेनेतून बाहेर पडून झालेल्या पहिल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे प्रमुख असलेल्या शिवसेनेला मतदारांनी निः संकोचपणे स्विकारले आणि बहुसंख्येने आमदार निवडून दिले. त्यामुळे त्यांच्यावर होणारी टिका ही राजकीय हेतुपुरस्सर आहे? अन्यथा जनतेने एकही प्रतिनिधी निवडून दिला नसता. याच आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात केलेल्या कामाची पोचपावती जनतेतून एकनाथ शिंदे यांना मिळाली. जनतेच्या समस्यांशी भांडणारी शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिसते, केवळ तोडफोड शिवसेना नव्हे हे शिंदे यांच्या कामातून जनतेने शोधले असेल.हे उघड उघड सत्य लपवता येणं कठीण. त्यामुळे स्वतः सतत कामात व्यस्त असणारा माजी मुख्यमंत्री, विद्यमान उपमुख्यमंत्री नाही तर ’ कॉमन मॅन ’ म्हणून त्यांची प्रतिमा कुणी हिरावून घेऊ शकेल आणि अभिमानाने मिरवू शकेल? तर नाहीच. खर तर महाराष्ट्राला आतापर्यंत लाभलेल्या सर्वच मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पण, ’कॉमन मॅन’ म्हणून बिरूदावली मिरवणारे हे पहिलेच मुख्यमंत्री.

– पदमाकर उखळीकर ,
मो.९९७५१८८९१२ .

## पान एक वरून

**भारत–पाकिस्तानमध्ये**

पोहोचले आहे. कराचीमध्ये तुर्कीच्या नौदलाचं जंगी स्वागत करण्यात आले. तुर्की नौदल आणि पाकिस्तानी नौदलामध्ये विविध विषयांवर चर्चा होणार आहे. ज्यामध्ये युद्ध प्रशिक्षण, मदत, परस्पर सहकार्य अशा विविध विषयांचा समावेश असल्याची माहिती समोर येत आहे.याबाबत माहिती देताना पाकिस्तानी सेनेच्या प्रवक्त्याने म्हटले आहे की, तुर्की नौदलाचे जहान पाकिस्तानमध्ये आले आहे. हे एक चांगले संबंध, बंधूभाव आणि पक्की मैत्री यांचे एक चांगले उदाहरण आहे. तुर्की नौदल आणि पाकिस्तानी नौदल यांच्यामध्ये यादरम्यान विविध विषयांवर चर्चा होईल. दोन्ही देशातील संबंध अधिक मजबूत करण्याची ही एक संधी आहे.

**पर्यटकांमध्ये सामिल होऊन**

असेही दिसून आले की, दहशतवादी त्याच भागात होते. पण त्यांच्या संवादाचे प्रकार वेगवेगळे असल्याने संभाषण समजू शकलेले नाही. सशस्त्र दहशतवादी मुक्तपणे फिरत आहेत, याची सरकारला चिंता आहे. या दहशतवादी हल्लूयापूर्वी सुरक्षा यंत्रणांना या धोक्याची माहिती मिळाली होती. श्रीनगरमधील हॉटेलमध्ये राहणा–या पर्यटकांना लक्ष्य केले जाऊ शकते, अशी ती माहिती होती. त्यामुळे शोध मोहीमही राबविली, असेही या अधिका–याने सांगितले.

**घटनास्थळावरून मोठा शस्त्रसाठा जप्त:** सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणांवरून स्नायपर रायफल्स, एम–सिरीज रायफल्स आणि चिलखत छेदणा–या गोळ्यांसारखी आधुनिक शस्त्रे जप्त केली आहेत. ही अफगाणिस्तानातील नाटो सैनिक दलातील उरलेली शस्त्रे असल्याचा संशय आहे.

**भाजपवाले शिंदे–पवारांचाही**

भ्रष्टाचारांना देखील घेतले आणि आपला पक्ष वाढवला मात्र उद्या यांच्याकडे सत्ता नसेल तेव्हा यांची सूद उतरलेली असणार आहे. तुमचा पक्ष विचार धारेवर वाढवा दुस–यांचे पक्ष चोरी का करतात? असा सवाल राऊतांनी विचारला आहे. भारतीय जनता पक्ष आजचा तारखेत ७०% उपदवापींचा पक्ष आहे त्यांचा भारतीय जनता पक्षाशी काहीही संबंध नाही, असा टोला राऊतांनी लगावला.

**बीडचा पाणी प्रश्न तत्काळ**

अजितदादा यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रशासनाकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाली आहे. प्रशासनाकडून लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पावले उचलण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांतून समाधान व्यक्त होत असून, लवकरच शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**इराणकडून तेल खरेदी**

शेअर करीत इराणकडून तेल खरेदी करणा–या कोणत्याही देशांवर सेकंडरी सॅक्शन लादण्याचा इशारा दिला. त्यानुसार इराणकडून तेल किंवा पेट्रोकेमिकल उत्पादने खरेदी करणा–या देशांशी अमेरिकेचा व्यापार थांबवला जाईल, असे ट्रम्प म्हणाले. विशेषत: चीन इराणचा सर्वात मोठा तेल ग्राहक आहे, यावर या धोरणाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयाचे मुख्य उद्दिष्ट इराणच्या अणुकार्यक्रमावर नियंत्रण ठेवणे आणि इराण समर्थित दहशतवादी गटांना पाठिंबा देण्यापासून रोखणे आहे. या धोरणामुळे इराणच्या तेल निर्यातीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या चीन हा इराणच्या कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश आहे. त्यामुळे ट्रम्प यांचा इशारा चीनकडेच असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**ॲपद्वारे रुग्णालय व्यवस्थेवर**

नाही तर ज्या ज्या योजना दिल्या आहेत, त्यासाठीच्या निधीची उपलब्धता पुढच्या टप्प्यात होईल, असे प्रकाश आबिटकर यांनी म्हटले.आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भात त्यांनी राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे जिल्ह्यातदेखील सर्वच निवडणुका एकत्रित लढवणे अपेक्षित आहे. सहकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येदेखील आम्ही एकमेकांच्या समन्वयाने लढलो तर राज्याचे चित्र दिसले ते जिल्ह्यात देखील दिसेल, असे ते म्हणाले.

**विद्यार्थ्यांना लाखांचा**

लक्षात आले. सिमकार्ड आणि कार्ड्स चोरल्यानंतर ‘फरगेट पिन’ पर्यायाचा वापर करत नवीन पिन निर्माण केला. नवीन पिनच्या साहाय्याने एटीएममधून रोख रक्कम काढली क्रेडिट कार्डद्वारे मॉलमध्ये व ऑनलाइन खरेदी करत एका तासात ५५ हजारांचे कपडे खरेदी केली. चोरट्यांना परीक्षा केंद्रावर वेळेची माहिती आधीच माहिती असल्याचे समजते आहे. परीक्षा देणारे काही विद्यार्थी नोकरी करणारे त्याच्या खात्यामध्ये बरीच रक्कम होती. ही चोरी सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत झाली असावी असा अंदाज वर्तवला जात आहे. या प्रकरणाबद्दल माहिती उस्मानपूरा आणि सातारा पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा सायबर सेल करत आहे

# पाडळी हायस्कूलला दोन लाखाचे बक्षीस प्राप्त



शिरूर /प्रतिनिधी

राज्यात मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अभियान प्रभावीपणे राबविले गेले यामध्ये अनेक शाळांनी सहभाग घेऊन आपली कला कौशल्य दाखविले त्याच अनुषंगाने शिरूर तालुक्यातून पाडळी हायस्कूल पाडळी या शाळेला मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे दोन लाखांचे बक्षीस मिळाले होते आज महाराष्ट्र दिनी या बक्षिसांची रक्कम रोख चेकद्वारे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अंगदराव दहिफळे सरपंच गहीनाथ पाखरे यांना गटविकास अधिकारी संजय केंद्रे गटशिक्षणाधिकारी संदीप शिंदे विस्तार अधिकारी शेख जमीर यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आली मुख्याध्यापक तथा प्राचार्य दहिफळे यांनी अत्यंत मेहनतीने वर्षभर शाळेत वृक्षारोपण शाळा रंगरंगोटी बोलक्या भिंती म्हणी सुविचार थोर महापुरुषांची प्रतिमा विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा आनंदी वातावरणात शिक्षण शाळा स्वच्छता विविध स्पर्धा मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आदि बाबींचे योग्य नियोजन करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले या बक्षीस कार्यक्रमास केंद्र प्रमुख सुनील खेडकर उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे माध्यमिक पर्यवेक्षक दिपक रत्नपारखी आण्णा राऊत मारुती धांडे महेश उगलमुगले आदींची उपस्थिती होती प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर प्रशासक डॉ . राजिवजी मचाले सहप्रशासक योगेश पवार कार्यवाहक एम ए राऊत आदींनी व ग्रामस्थांनी प्राचार्य दहिफळे यांचे अभिनंदन केले .

## पान सहा वरून

**एसपी दारात उभे;अन् पोलीस**

दरम्यान तात्काळ पोलीस अधिक्षक यांनी शिवाजी नगर पोलिसांना बोलावून बाळू बहिरवाळची जिल्हा रुग्णालयात तपासणी करण्याचे आदेश दिले. यावेळी बाळूने गांजाचे सेवन केल्याचे अहवालातून समोर आल्यानंतर त्याच्यावर शिवाजी नगर पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान आरोपीला सेवेतून निलंबित करण्यात आल्याची देखील माहिती असून थेट पोलीस कर्मचारीच कायद्याचे पालन करणार नसतील तर जिल्ह्यात खाकीचा धाक राहणार कसा? हा प्रश्न आता निर्माण होत आहे.

**बडेवाडीत अखंड हरिनाम**

महाराज शास्त्री बुधवारी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त बडेवाडी आशीर्वचन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत,नित्रुड येथून डॉ.नामदेव शास्त्री यांची मिरवणूक होणार आहे. भाविक भक्तांची सायंकाळी ४ वाजता पायी पदयात्रा टाळ मृदंगाच्या निनादात काढण्यात येईल. सायंकाळी ६ वाजे दरम्यान बडेवाडी येथे भाविक भक्तांना डॉ.नामदेव महाराज शास्त्री आशीर्वचन देतील. या कार्यक्रमानंतर रात्रौ ९ वाजता विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत भगवान बाबा तरुण मित्र मंडळ व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**माजलगावमध्ये श्रामणेर शिबिर**

आद. शामराव वाघमारे,आद. आशाताई मोरे,आद. संजिवनीताई धन्वे (संस्कार सचिव, जि.बीड पूर्व), आद. के. व्ही. साळवे (सचिव पर्यटन–प्रचार जि.बीड पूर्व), आद. बी. सी. डोंगरे,आद. शोभाताई भोजने,आद .शारदाताई तांगडे (जिल्हा संघटक बीड पूर्व),आद. मंदाताई साळवे (ता.अध्यक्ष माजलगाव महिला),आद. विष्णू तूपसागर (ता.अध्यक्ष धारूर),आद. गुलाबराव धाईजे (ता. उपाध्यक्ष संस्कार),व इतर माजलगाव शहर व ता. पदाधिकारी,उपासक–उपासिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आद. सिद्धार्थ वक्ते (सरचिटणीस ता. माजलगाव) यांनी केले.या शिबीराची सांगता दिनांक १२ मे २०२५ रोजी तथागत भगवान बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंतीदिनी करण्यात येणार आहे. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी माजलगाव ता. व शहर शाखेचे सर्व सन्मानिय पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

**सचिन दहिफळेंचा यथोचित**

जिल्ह्यात राष्ट्रीय पशूधन मिशन अंतर्गत ज्या बॅंकेच्या अधिकाऱ्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये उमापूर, घाटसावळी, घाटनांदूर, परळी या शाखेतील कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये परळी शाखेतील ॲग्री फिल्ड ऑफीसर सचिन दहिफळे यांचा राष्ट्रीय पशूधन मिशन अंतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल पशू संवर्धन, पर्यावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देवून गौरव करण्यात आला. याबदल शाखाधिकारी विजयकुमार तिरपुडे, विलास राठोडसह अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

**पाटोद्यात वाहन पार्किंगचा**

यावा, असे स्पष्ट मत नागरिकांनी मांडले आहे. नगरपंचायतीने याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेकडून व्यक्त होत आहे. अन्यथा संभाव्य अपघातांसाठी जबाबदारी कोणाची, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.

**..नसता गावकरी जलसमाधी**

तलावामध्ये जलसमाधी घेण्यासाठीचे निवेदन माननीय कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड यांचेकडे संबंधित सातरा पोतरा साठवण तलाव फोडलेला सांडवा दुरुस्त करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. सदरची मागणी ही तात्काळ मंजूर न झाल्यास आंबील वडगाव कुंभारी साथरा पोत्रा साठवण तलावाच्या परिसरातील सर्व नागरिक या ठिकाणी जलसमाधी घेणार असल्याचेही यावेळी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

**...तरच आपले प्रश्न सुटतील**

संघटीत होवून आपले प्रश्न मार्गी लावण्यासाठी आंबेडकरी विचारांची ताकद दाखवावी. यावेळी राजु जोगदंड, किसन तांगडे बापू पवार, संतोष जाधव, गोंविद जाधव, अशोक जाधव, संतोष सोनवणे, यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## खेलो इंडियासाठी गतका संघ दाखल

**कल्याण :** सातव्या खेलो इंडिया स्पर्धेकरिता बालेवाडी येथे क्रीडा युवक सेवा संचालनाने प्रशिक्षण शिबिर संपवून पुढील स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय सहसंचालक सुधीर मोरे, असोसिएशन ऑफ गतका महाराष्ट्र च्या उपाध्यक्ष अभिनेत्री अश्विनी महांगडे, सचिव प्रा.आरती चौधरी यांनी खेळाडूंना उत्कृष्ट प्रतीचा खेळ खेळून पदक प्राप्तीसाठी शुभेच्छा दिल्या. संघ ३ मे रोजी बिहारमध्ये दाखल झाला असून या स्पर्धा ५ मे ते ७ मे दरम्यान बिहार मधील गया या ठिकाणी होणार आहे. या संघाचे प्रशिक्षक प्रा.आरती चौधरी, मंथन पवार तसेच संघ व्यवस्थापक आकाश थोरात क्रीडा अधिकारी हे काम पाहणार आहेत.

### वेचक

## स्केटिंग स्पर्धेत स्केटलाईफला विजेतेपद



**कल्याण :** स्केटिंग असोसिएशन ऑफ कल्याण तालुका आणि स्पोर्ट्स केयर फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने रिजन्सी अन्टालिया शहाड येथे ७ वी कल्याण ट्रॉफी खुली स्केटिंग स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत 'मीरा-भाईंदरच्या 'स्केटलाईफ स्पीड स्केटिंग ॲकॅडमी'ने १५५ गुण घेत स्पर्धेचे अंतिम विजेतपद मिळवले. सर्व विजेत्या संघाना कल्याण ट्रॉफी आणि खेळाडूंना सुवर्ण, रौप्य आणि कास्यपदक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत मुंबई विभागामधून ३३० खेळाडूंनी सहभाग घेऊन स्पर्धेला मोठा प्रतिसाद दिला. स्पर्धा 'स्केटिंग'च्या ५ विविध प्रकारात खेळवण्यात आली. या सर्व खेळाडूचा प्रशिक्षक संतोष मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेला पालकांनी मोठा प्रतिसाद दिला. या स्पर्धेत पार्थी परमार, रोशन कोसांबिया, आकृती संजय झा, जियाना शेट्टी, सात्विका मूर्ती, त्विषा जव्हेरी, वेदांत शिंदे, रुद्रांश दास, मालविका बाईंग, मोहमद इब्राहिम, प्रशिव लोटके, ध्रुविका रावराणे, आरव सिंह, मार्विन डिसोझा, जियान प्रजापती, प्रिशा सिंह, ह्वीद्या देशमुख, ओम हांडे, विवान गुप्ता, प्राक्षी चौधरी, हृदयम महींकार, आरुष अय्यर या खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले. तर श्रवंती, अलिश्बा शेख, रोनक कोसांबिया, शौर्य गोहिल, नीरव पाटील, रिशाल जैन, झारा फातिमा, स्वरांजली ससाणे, भव्य शाह, आलिया शेख, कबीर शेख, प्रियांश पठारे या खेळाडूंनी रौप्य पदक पटकावले.

## रमझान शेख यांच्या जनसेवा कार्यालयाचे जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते उद्घाटन

**कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तसेच विधिमंडळ गटनेते आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते



तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांच्या पक्ष कार्यालयाचा उद्घाटन सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीमुळे या नव्या कार्यालयाद्वारे पक्षाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि जनतेपर्यंत थेट पोहोचता येईल. तसेच या कार्यालयाच्या माध्यमातून स्थानिक जनतेच्या अडचणी ऐकून घेणे, पक्षाची ध्येयधोरणे पोहोचवणे व युवकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट राहील, असे रमझान शेख यांनी सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस राजेश कदम, ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे शहर सचिव सुनील कुऱ्हाडे, शीळ विभाग अध्यक्ष गणेश मुंडे, खारघर शहराध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, शहर सरचिटणीस मंथन कांबळे, इकबाल शेख यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केडीएमसीच्या ‘ई’ प्रभागातील नालेसफाई कामांची शहर अभियंतांनी केली पाहणी

**◆ कल्याण (वार्ताहर) :**

कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील दहा प्रभाग क्षेत्रातील मोठे नाले, मध्यम स्वरूपाचे नाले गटारांची पावसाळ्यापूर्वी ची स्वच्छता सफाई कोट्यवधीची कामे ठेकदारांमार्फत सुरू असल्याने या कामावर प्रशासनाचा अंकुश असतो. रविवारी ई प्रभागाक्षेत्रातील मोठे, नाले, मध्यम स्वरूपाचे नाले, गटाराच्या सफाई कामाची पाहणी

### शहर अभियंता ॲक्शन मोडवर

शहर अभियंता अनिता परदेशी यांनी रविवारी केली. नालेसफाई कामात ठेकेदाराचा कामचुकार पणा, अपुरे मुन्यषबळ या गोष्टी नजरेत आल्याने शहर अभियंता अनिता परदेशी ॲक्शन मोडवर आल्या असल्याची माहिती मिळाली.

कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील सुमारे ४ कोटी रु. नाले सफाई कामे तसेच मध्यम स्वरूपाचे छोटे नाले, गटारे यांची सुमारे साडेतीन कोटी रु सफाई कामे विविध एजन्सीच्या ठेकेदारामार्फत सुरू असून पावसाळ्यापूर्वी मोठे नाले, मध्यम स्वरुपाची छोटे नाले, गटारे यांच्यामधील कचरा, तसेच डीप क्लीन करीत पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल. जेणेकरून लो लाईन परिसरातील परिसरात संभाव्य पाणी शिरणार नाही यांची दक्षता घेतली जाते. जेणेकरून, सखल भागातील रहिवाशांना दिलासा मिळेल आणि पावसाळ्यात पाण्याची तुंबापुरी होणार नाही. यासाठी प्रशासन कोट्यवधीचा खर्च नालेसफाई साठी करते.

नालेसफाई कामे बरोबर होत आहेत का नाही. यासाठी पाहणी केली जाते. रविवारी केडीएमसी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी " ई " प्रभाग क्षेत्रातील नालेसफाईची पहाणी केली असता त्यांच्या निर्दशानास आले की, संजय नगर सागाव एमआयडीसीमधील नाला

### नालेसफाईची कामे असमाधनकारक



### ठेकेदारांकडून बेजबाबदारपणा

निळजे नाल्याचेही काम अगदी निकृष्ट पद्धतीने केले जात होते. या पाहणी दौऱ्यानिमित्ताने शहर अभियंता या नालेसफाईच्या पोलखोलीमुळे संतापल्या असून त्या ॲक्शन मोडवर आल्याची माहिती मिळाली असून नालेसफाई कामात दुर्लक्ष करणारे ठेकेदार वेळ काढूपणा करत आहेत व त्याबाबत कोणताही दैनंदिन पाठपुरावा उपअभियंता स्तरावर दिसून येत नाही. तसेच कामाचे प्रत्यक्ष ठिकाणाची एकत्रित पाहणी ठेकेदार व उपअभियंता यांनी केलेली नाही, हा खूप बेजबाबदारपणा आहे. उपअभियंता हे रजेवर अथवा अन्य कामात व्यस्त असले तरी त्यांनी किमान दोन तासांनी भ्रमण दूरध्वनीवर ठेकेदारावर प्रेशर ठेवणे गरजेचे आहे, तसे दिसून आले नाही.

### कारवाई करण्याचा इशारा

सुरू असलेल्या कामांवर मी शहर अभियंता म्हणून समाधानी नाही. अशाच प्रकारे अन्य प्रभागाच्याही तक्रारी आहेत. सबब येत्या तीन दिवसांत प्रभागातील सर्व कामांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, अन्यथा ठेकेदार व उप अभियंता यांच्यावर नाईलाजास्तव कारवाई करणे भाग पडेल व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार असाल, याची नोंद घ्यावी अशी तंबी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी दिली असल्याने नालेसफाई कामात कामचुकार ठेकेदार, अधिकारी यांची आता खैर नसल्याचे चित्र या निमित्ताने दिसत आहे.

२४ ते २८ एप्रिल या दरम्यान पूर्ण झाल्याचा अहवाल उपभियंता यांच्या बार चार्टमध्ये दिसून येतो तथापि प्रत्यक्ष पाहणीत केलेले काम हे केवळ वरचा कचरा व जलपर्णी काढल्याचे दिसून येते नाल्याच्या दोन्ही बाजूचा काठ झाडेझुडपे काढून स्वच्छ केलेला दिसून आले नाहीत. इ प्रभाग क्षेत्रात एकूण १५ नाले असून केवळ दोन ठिकाणी काम सुरू आहेत व तेथे सुद्धा केवळ दहा ते बारा मजूर काम करीत आहेत ही संख्या पुरेशी नाही.

# पाणीपुरवठ्यासाठी जलनियोजन महत्वाचे

ठाणे जिल्ह्यात अनेक गावात पुरातन असे तलाव आहेत. त्यावरून त्या काळात नागरिकांनी पाणी साठवणीला किती महत्त्व दिले होते हे लक्षात येते.ठाणे जिल्ह्यात पूर्व पश्चिम भागात नद्या आहेत.त्याच्या पाण्याचाही गावासाठी उपयोग होत असतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ठाणे जिल्ह्यात पावसाचे प्रमाणही चांगले समाधानकारक आहे. असे असूनही दरवर्षी या जिल्ह्यातील नागरिकांना तीव्र पाणी टंचाईशी सामना करावा लागतो. ग्रामीण भागाचे झपाट्याने शहरी करण झाल्याने लोकसंख्या वाढीचा वेगही लक्ष्यणीय आहे. मुंबई शहराला



**विनायक बेटावदकर**
**कल्याण**

हा जिल्हा लागून असल्याने नोकरी व्यवसाय निमित्ताने या भागात बाहेरून येऊन मोठ्या संख्येने लोक स्थायिक झालेले दिसतात. या सर्वांचा परिणाम या भागातील नागरी सेवांवर झालेला दिसून तर येतोच पण त्यातून पाणी प्रश्नाला नागरिकांना मोठ्या प्रमाणावर सामोरे जावे लागते.

या वर्षीही मुरबाड, कल्याण, जव्हार, वाडा विक्रमगड आणि त्या परिसरातील ग्रामीण भागात पाणीटंचाई अधिक जाणवते ग्रामीण भागातील महिला तर डोंगर दऱ्यातील खाच-खळग्यातून वाटा काढीत. खड्ड्यात साठलेले पाणी वाट्या-भांड्याने हंड्यात जमा करताना दिसतात. काही भागात विहिरीत खोलवर गेलेले पाणी विहिरीत उतरून भांड्याने बादल्यात भरून ते वर काढताना दिसतात. बैलगाड्यांवर पिंप ठेऊन पाणी जमा करतात. गेल्या २०-२५ वर्षांपासून पाणीटंचाई दूर करण्याचे अनेक प्रयत्न झाले. कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला तरीही हे सर्व वाया गेल्याचे म्हणावे लागते. पाणी टंचाई आहे तशीच आहे.

ठाणे जिल्ह्याचेच उदाहरण घेतले तरी पश्चिम पट्टीतील मोखाडा, जव्हार, विक्रमगड, वाडा या चार तालुक्यातील सहा गावे. ५५ पाड्यांतील २२ हजारांवर लोकसंख्या आहे. शिवाय पशुंसाठी १९ टँकरने पाणी आणले जात आहे. पण पालघर, तालुक्यात दातिवरे येथे गावकऱ्याना १५ ते २० दिवसांतून एकदाच पिण्याचे पाणी मिळत आहे. असे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे मच्छीमारीसाठी सातपाटी हे गाव सर्वज्ञात आहे. पण तेथेही आठवड्यातून एकदाच पाणी पुरवले जाते. वैतरणा खाडीत वाढीव बेटावर पिण्याचे पाणीही मिळत नाही.

यावर प्रशासनाकडून ज्या प्रमाणे पाणीपुरवठ्याचे प्रयत्न सुरू आहेत त्या प्रमाणे नागरिकांनीही त्याना सहकार्य देण्याची गरज आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या काळात बांधकामासाठी पाणी वापर टाळणे महत्त्वाचे आहे. व्यवसायासाठी, आवश्यक तेव्हडेच पाणी वापरावे. गाड्या धुणे टाळावे. पाण्याचे नियोजन हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या भागातील जलाशयांचे संरक्षण केले पाहिजे. गावातील तलावांची स्वच्छता, तलाव विहिरींचा गाळ काढून खोली वाढवण्यात आली तर अधिक पाणी मिळू शकेल. खानदेशात पूर्वी वाड्यांमधून हौद होते या हौदात पाणी साठवून त्याचा घरासाठी, तसेच गुरांसाठी पाण्याचा वापर केला जाई. आज अनेक गावात नळपाणी योजना आल्या. पण पाण्याला पुरेसा दाब नसल्याने. इमारतींच्या वरच्या मजल्यांना पाणीपुरवठा होण्यात अडचणी येतात. शासनाच्या पाणीपुरवठा योजनेबरोबर खासगी सोसायट्यांनीही आपल्या भागात विहिरी खोदल्या. पावसाचे पाणी गोळा करून ते साठवण्याची व्यवस्था केली, तर पाणी उपलब्ध होऊ शकेल. अलीकडे नद्यांमध्ये रसायने टाकली जातात. त्यामुळे पाणी अशुद्ध तर होतेच पण नागरी आरोग्यही धोक्यात येते. शहरातील वापरलेले सांडपाणी शुद्ध करून नद्यांत सोडले, तर पाणी शुद्ध राहण्यास सहाय्य होते.

# येऊर परिसरात राबविण्यात आली सर्वंकष स्वच्छता मोहीम



**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे महापालिका क्षेत्रातील येऊर परिसरात शनिवारी सर्वंकष स्वच्छता मोहिमेचेआयोजन करण्यात आले. येऊर मधील बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. उपायुक्त दिनेश तायडे, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त तनुजा रणदिवे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापालिकेतर्फे दैनंदिन स्वरूपात स्वच्छता केली जाते. त्याच जोडीला दोन वर्षांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेनुसार नियमितपणे सर्वंकष स्वच्छता मोहीमही राबवली जाते. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार येऊर परिसरात या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

येऊर येथील बसस्थानक परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात ठिकठिकाणी पडलेल्या प्लास्टिक बाटल्यांचा कचरा उचलण्यात आला. तसेच इतर भंगार साहित्य उचलून सदर भागाची साफसफाई करण्यात आली. तसेच तेथील रस्त्यांवरील कचरा उचलून स्वच्छता करण्यात आली.स्वच्छतेचा दर्जा उंचावणे सार्वजनिक जागांचा कायापालट घडवून आणणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

# मीरा-भाईंदरमधील अतिधोकादायक ३८ इमारती जमीनदोस्त करणार

**◆ भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा भाईंदर शहरात ५१३ धोकादायक इमारती असून त्यातील ३८ इमारती अतिधोकादायक असल्याने सुरक्षतेच्या दृष्टीने आगामी पावसाळ्याच्या आधीच महिनाभरात जमीनदोस्त करण्याचे तसेच धोकादायक इमारतींची तात्काळ देखभाल दुरुस्ती करण्याचे आदेश सोसायटीना पालिका प्रशासनाने दिले आहेत. पावसाळ्यात धोकादायक इमारती पडून दुर्घटना होण्याची शक्यता अधिक असल्याने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पावसाळ्यापूर्वी शहरातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी केले जाते. त्यानंतर त्याची यादी जाहीर करण्यात येते यंदाही ते अपेक्षित असताना यादी जाहीर



न झाल्याने महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी यादी लवकर जाहीर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले होते. त्यानुसार विभागाने ५१३ धोकादायक इमारतींची यादी जाहीर केली असून त्यात ३८ इमारती अतिधोकादायक आहेत. यामध्ये मिरारोडच्या २४ तर भाईंदरच्या १४ इमारतींचा समावेश आहे. राहण्यास योग्य नसलेल्या इमारतींना सी-१ श्रेणी म्हणून अत्यंत जीर्ण घोषित करून पाडण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. तर ४७५ धोकादायक इमारतींना वर्गीकरणानुसार इमारत रिकामी करून दुरुस्ती करणे इमारतीची किरकोळ दुरुस्ती करणे अशा प्रकारे नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

> “ अतिधोकादायक इमारती मोकळ्या करून जमीनदोस्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्या इमारती स्वतःहून न तोडल्यास सुरक्षेच्या दृष्टीने पालिका कारवाई करून त्याचा खर्च सोसायटीकडून वसूल करेल तसेच धोकादायक इमारतीची देखभाल दुरुस्ती करून त्याचे पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
>
> **- डॉ. संभाजी पानपट्टे**, (अतिरिक्त आयुक्त) मीरा-भाईंदर महापालिका

# सोशल मीडिया, ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी केंद्र शासन कठोर कायदा करणार

### खासदार नरेश म्हस्के यांच्या मागणीला केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचे लेखी उत्तर

**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**

बिभिस्त, अश्लील आणि हिंसक कंटेंट प्रसारित करणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया, ओटीटी प्लॅफॉर्म संदर्भात नियम ३७७ अंतर्गत खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेमध्ये आवाज उठवला होता. तसेच या संदर्भात भारत सरकारचे रेल्वे, माहिती व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णवजी यांना लेखी निवेदन दिल्यानंतर त्यांनी सरकार लवकरच यावर कडक कायदा आणण्याच्या तयारीत आहे असे लेखी उत्तर खासदार नरेश म्हस्के यांना दिले आहे.



आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचे महत्त्व नक्कीच खूप मोठे आहे. माहितीच्या देवाणघेवाणीपासून ते लोकांमध्ये संवाद वाढवण्यापर्यंत, या प्लॅटफॉर्म्सने एक वेगळीच क्रांती घडवून आणली आहे. मात्र, दुर्दैवाची गोष्ट अशी की, या स्वातंत्र्याचा आणि संधीचा काही मंडळी अक्षरश गैरवापर करत आहेत असे खासदार नरेश म्हस्के यांनी निदर्शनास आणून दिले होते. एजाज खान यासारखे अनेक कंटेंट क्रिएटर्स, सोशल मीडियावर ‘कॉन्टेन्ट’च्या नावाखाली अश्लीलता पसरवत आहेत. भाषेचा स्तर घसरवणं, अंगविक्षेप, समाजात विकृती वाढवणारे संवाद, हिंसक वर्तन हे सर्व दिवसेंदिवस सामान्य होत चाललं आहे. तरुणाईला आकर्षित करण्याच्या नावाखाली अश्लीलतेचा कळस गाठणारे हे व्हीडिओज आणि पोस्ट्स पाहून भारतीय संस्कृतीला लज्जा वाटावी अशी परिस्थिती निर्माण होत आहे खासदार नरेश म्हस्के यांनी म्हटले होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर, खासदार नरेश म्हस्के यांनी नियम ३७७ अंतर्गत संसदेमध्ये आवाज उठवला होता. या नियमाअंतर्गत अशा सर्व डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर नियंत्रण आणण्याची, सेन्सॉर प्रणाली लागू करण्याची आणि अश्लीलतेचा प्रसार करणाऱ्या कंटेंटवर बंदी आणण्याची मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी केली होती. भारत सरकारचे रेल्वे, माहिती व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार नरेश म्हस्के यांच्या मागणीची गंभीर दखल घेतली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार नरेश म्हस्के यांना लेखी पत्राद्वारे उत्तर दिले असून, सरकार लवकरच यावर कडक कायदा आणण्याच्या तयारीत आहे असे म्हटले आहे. यासाठी वैष्णवजी यांचे खासदार नरेश म्हस्के यांनी जाहीर आभार मानले आहेत.

# कर्करोग निदान मोबाइल बसमध्ये ३५० जणांची तपासणी

### गर्भाशय ७, ब्रेस्ट ४, तर दोघांना मौखिक कर्करोगाची लक्षणे

**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**

कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यावर त्याच्यावर उपचार करणे सुलभ होत असून ठाणे जिल्ह्यात आरोग्य विभागा मार्फत कर्करोग निदान मोबाइल बस ठाणे शहरात रुग्णांच्या सेवेसाठी दाखल झाली आहे. गेल्या दोन दिवसात ३५० रुग्णांची कर्करोग तपासणी करण्यात आली असून, यामध्ये गर्भाशय ७, ब्रेस्ट ४ , तर दोघांची मौखिक कर्करोगाची लक्षणे आढळल्याने त्यांची छोटी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. आरोग्य उत्तम राहावे यासाठी आरोग्य प्रशासन सकारात्मक उपक्रम राबवत आहे. मात्र काही वेळा मोठ्या आजारावर खर्च करणे सर्वांना शक्य होत नाही. याच पार्श्वभूमीवर ठाणे शहरात आरोग्य प्रशासना मार्फत कर्करोग निदान मोबाईल बस फिरत आहे. आरोग्य उपसंचालक डॉ. अशोक नांदापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली



शहरातील कासारवडवली, सिद्धेश्वर तलाव या ठिकाणी साधारण ३५० व्यक्तींची कर्करोग तपासणी करण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील महापालिका क्षेत्रात ही बस फिरत असून गेल्या तीन दिवसांपासून ठाणे शहरात आहे. या बसमध्ये रुग्णांची मौखिक, गर्भाशय आणि स्तन आदींची कर्करोग तपासणी केली गेली. यावेळी गर्भाशय ७, ब्रेस्ट ४ तर दोघांना मौखिक कर्करोगाची लक्षणे दिसली. त्यामुळे मौखिक कर्करोग झालेल्या दोघांची बायोप्सी करून छोटी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. ही बस सोमवारी किसन नगर, मंगळवारी वर्तक नगर भागात उभी असणार आहे. तपासणी पथकामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.नंदिनी देशमुख, डॉ. लीना कुंभारे , डॉ. अर्चना पवार, डॉ. हितेश सिंघवी आणि डॉ.प्रज्ञा चौधरी.डॉ. सुजाता पाडेकर यांबरोबर स्टाफ नर्स आदींनी अथक परिश्रम घेत आहेत.

# राष्ट्रवादी पक्षाकडून स्वागतासाठी लावलेली कमान भर रस्त्यात कोसळली

**◆ कल्याण (वार्ताहर) :**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून काढण्यात आलेल्या महाराष्ट्र गौरव रथ कलश यात्रा कल्याणमध्ये दाखल झाली होती. या यात्रेच्या स्वागतासाठी दुर्गाडी चौकात भव्य कमान लावण्यात आली होती. या कमानावर यात्रेच्या स्वागत आणि राष्ट्रवादीच्या नेत्याचे फोटो लावले होती. ही कमान आज कोसळून रस्त्यात पडली. त्याचा त्रास वाहन चालकांसह पादचाऱ्यांना सहन करावा लागला. ही घटना घडून चार ते पाच तास उलटून गेले तरी रस्त्यात पडलेली कमान हटविण्यात आलेली नव्हती. बऱ्याच वेळेनंतर ही कमान हटविण्यात आली. मात्र या घटनेमुळे शहरात अशा प्रकारे रस्त्यात कमानी लावून नागरिकांना अडथळा ठरणाऱ्या कमानींबाबत कारवाई करण्याची मागणी येत आहे.

### मेट्रोचे काम सुरू असल्याने वाहतूक नियंत्रण शाखा हतबल

# कल्याण शीळ रोड येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार कधी?

**◆ डोंबिवली (वार्ताहर) :**

कल्याण-डोंबिवली परिसरातील अनेक जण काम उद्योग-धंद्यासाठी कल्याण शीळ रोडचा जा-ये वापर करावा लागतो कारण दुसरा पर्याय उपलब्ध नाही. मात्र या वाहतूक कोंडीला जबाबदार असलेली बेकायदेशीर बांधकाम, ती हटविण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखा व महापालिकेने २०१५ ते २०२५ या वर्षात काही उपाययोजना केल्या आहेत का या विषयावर माहितीच्या अधिकाराखाली विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वाहतूक नियंत्रण शाखेच्या अधिकारी



यांनी काहीच प्रयत्न केले नाहीत हे नाही किंवा पाठपुरावा ही केला नाही अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

कल्याण शीळ रोड पूर्वी दोन पदरी होता त्याचा चारपदरी झाला आतातर तो सहापदरी होऊन ही वाहतूक कोंडी मात्र न सुटता दिवसेंदिवस वाढत चालली आहे त्या आता मेट्रोचे काम सुरू आहे त्यामुळे जागोजागी मेट्रोचे आवर अवाढव्य खांब उभारण्यात येत आहेत त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडली आहे. ती कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस हतबल आहेत. दुसरे असे वाहतूक नियंत्रण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या पोलिसांना दंड वसूल करण्यासाठी कोटा पूर्ण करण्यासाठी धडपड करावी लागते.

### उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावणार

या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून मनसे सरसावली असून त्याविषयी माहिती देताना मनसे पदाधिकारी अरुण जांबळे म्हणाले की आंदोलन करण्यात आले होते आता याविषयावर उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले जाणार आहेत. रस्ते विकासासाठी आड येत असलेली बांधकामे पण ती तोडू नये ही त्यासाठी राजकीय दबाव येत आहे. सकाळच्या वेळी मुंबईकडे जाताना व सायंकाळी डोंबिवली-कल्याणकडे परत येताना अनेक वेळ वाहतूक कोंडी होते. काही वेळा तर तासंतास होते. या साठी वाहतूक नियंत्रण शाखेत कर्मचारी कमी आहेत असे उत्तर दिले जात आहे. या प्रश्नाकडे गांभीर्याने शासनाने बघणे जरूरीचे आहे मंत्री महोदय येतात तेव्हा वाहतूक कोंडी का होत नाही हा प्रश्न सातत्याने विचारला जातो.

# नवीन शैक्षणिक वर्षासाठी महापालिकेच्या शाळेसाठी शिक्षक सज्ज

**◆ भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर शहरातील गरजू विद्यार्थ्यांना महापालिकेच्या शाळेत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी पटसंख्येच्या तुलनेत आकृतीबंध नियमानुसार आवश्यक शिक्षकांची पूर्ण पदे असल्याने आता नवीन शैक्षणिक वर्षासाठी महापालिका शाळेचे शिक्षक सज्ज झाले आहेत. मीरा-भाईंदर शहरातील आदिवासी पाडे, ग्रामीण भाग यातील सर्वसामान्य पालक आपल्या पाल्यांना पालिकेच्या शाळेत पाठवतात. शहरात महापालिकेच्या ३६ शाळा असून त्यात २२ मराठी माध्यमाच्या, ४ हिंदी




माध्यमाच्या, गुजराती आणि उर्दू माध्यमाच्या प्रत्येकी ५ असा सामावेश असून ८,५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासाठी १४३ शिक्षक कार्यरत आहेत. महापालिकेच्या आकृतीबंध नियमानुसार २२५ शिक्षकांची पदे मंजूर आहेत. महापालिकेने १४३ स्थायी शिक्षकांसोबत ६३ शिक्षण सेवक, ३५ ठोक मानधनावर शिक्षकांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे शिक्षकांची संख्या २४१ झाली आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे शिक्षण देण्यासाठी महापालिकेचे शिक्षक सज्ज झाले आहेत.

# भारताकडून पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी

पहेलगाम हल्ल्यानंतर सर्वात पहिला परिणाम भारताकडून पाकिस्तानविरूद्ध कठोर पावले उचलण्यात झाला आणि त्यातही पहिला होता तो इंडस वॉटर ट्रीटी स्थगित करण्यात आला. हा करार दोन देशांतील पाणीवाटपाचा करार आहे आणि त्यामुळे पाकिस्तानच्या नाकातोंडात पाणी गेले आहे. हे साहजिक होते कारण पाकिस्तानच्या मांडीवर बसून भारतातील निरपराध लोकांच्या हत्या घडवणाऱ्या अतिरेक्यांना धडा शिकवणे गरजेचे होते आणि तेच मोदी सरकारने केले. मोदी सरकार म्हणजे नेहरू सरकार किंवा काँग्रेस नव्हे. मोदी सरकारने ताबडतोब पाकिस्तानचे पाणी बंद केले आणि पाक आता बोंबा मारत सुटला आहे. पण दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदूंच्या पर्यटकांच्या हत्या केल्या आणि त्यांची सुंता झाली आहे की नाही हे पाहिले अशा क्रूरकर्मा दहशतवाद्यांच्या बाबतीत इतकेच कठोर उपाय योजणे गरजेचे होते. तेच भारत सरकारने केले. १९६० सालचा हा करार नेहरू सरकारमुळे भारताच्या माथी मारण्यात आला. यात पाकिस्तानचा सर्वंकष फायदा होता, पण तो आता स्थगित करण्यात आला आहे आणि त्यामुळेही पाकच्या नाकातोंडात पाणी गेले आहे. याबरोबरच पाकिस्तानला अनेक प्रकारे धडा शिकवण्यात येत आहे.भारताने पाकिस्तानकडील सर्व आयात बंद केली आहे. त्यामुळे अगोदरच कंगाल झालेला पाकिस्तान आणखी कंगाल होण्याच्या बेतात आहे. त्यातच आज एक आणखी बातमी अशी आहे की पाकिस्तानची एअर लाईन्स संकटात गटांगळ्या खात आहे. कारण भारताने आपल्या हवाई हद्दी वापरण्यास बंदी केली आहे. पाकिस्तानेही भारतीय विमान कंपन्यांना त्यांची हवाई हद्द वापरण्यास मनाई केली आहे. पण भारताचे त्यामुळे नुकसान होणार नाही, तर पाकिस्तानसाठी हा कुठाराघात ठरणार आहे. त्याशिवाय भारताच्या दबावामुळेच पाकिस्तानला होणारी आर्थिक मदत आता ठप्प होणार आहे. मोदी सरकारने पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्धार पक्का केला आहे आणि त्याचे पहिले प्रत्यंतर आले आहे. पाकिस्तानच्या शेतकऱ्यांनी आमचे पाणी बंद केल्यामुळे आम्ही उपाशी मरणार आहोत असा कांगावा करण्यास सुरुवात केली आहे. पण ती वस्तुस्थिती असली तरीही हिंदू पर्यटकांना धर्म विचारून त्यांची हत्या करणाऱ्या नराधम दहशतवाद्याच्या कृत्याबद्दल पाकिस्तानी नागरिकांना शिक्षा होत असेल, तर त्याला कुणाचाच इलाज नाही. याबाबतीत शिवाजी राजांचे उदाहरण आठवते. त्यांनी त्यांच्याशी युद्ध करणाऱ्या इग्रजांच्या वतीने लढताना युनियन जॅक गर्वाने लहरवणाऱ्या इंग्रजांना असाच धडा शिकवला होता आणि इंग्रजांना मुश्कीलीत टाकले होते. तोच कित्ता मोदी यांनी गिरवला आहे. पाकिस्तान एअर लाईन्स संकटात आहे, तर पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून पाकिस्तानचा सिंधू जल करार स्थगित करण्यात आला आहे, तर पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि युरोपीय युनियन यांच्याकडून कर्ज मिळू नये म्हणून भारताने दबाव टाकला आहे. या सर्वांचा पाकला तोटा असा की त्याच्या आर्थिक नाड्या चांगल्याच आवळल्या गेल्या आहेत. यातून पाक कधीच सावरणार नाही हे निश्चित आहे.

भारताने पाकिस्तानविरोधात सर्जिकल स्ट्राईक केला आहे आणि त्यानुसार पाकिस्तानकडून संपूर्ण आयात बंद केले आहे. त्यामुळे पाकिस्तानचा श्वास गुदमरणार आहे. पाकिस्तानला आर्थिक आघाडीवर मोठा झटका बसणार आहे. विशेषज्ञांचे असे म्हणणे आहे की या निर्णयामुळे पाकिस्तानचे नुकसान प्रचंड होणार आहे. अगोदरच कर्ज, महागाई आणि बेरोजगार यांच्याशी लढत देणाऱ्या पाकिस्तानला या भारताच्या कठोर पावलामुळे जिणे अवघड होणार आहे. भारताच्या निर्णयामुळ पाकिस्तानची जनता दाण्यादाण्याला पारखी होणार आहे असे काहींचे म्हणणे आहे. पण आपण तितके वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. कारण पाकिस्ताननेच हे संकट ओढवून घेतले आहे. भारताने शनिवारी एका अधिसूचना जारी करून म्हटले आहे की एक नवीन तरतूद एफटीपी जोडण्यात आली आहे. त्यामुळे भारताकडून केल्या जाणाऱ्या आयातीवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. यामुळे पाकचे कंबरडे मोडणार आहे आणि पाकला हीच शिक्षा योग्य आहे, भारताकडून पाकला जाणाऱ्या वस्तुंमध्ये कापूस, केमिकल्स आणि फूड प्रोडक्टस यांचा समावेश होतो. पण भारतावर आयात किंवा निर्यात बंद केल्याचा काहीच परिणाम होणार नाही. कारण भारताची अवस्था इतकी काही नाजूक नाही. उलट पाकची अवस्था दयनीय आहे आणि त्याला भरताच्या या कृतीचा फटका बसणार आहे. पहलगाम हल्ल्यानंतर आणि विशेषतः निरपराध हिंदू पर्यटकांना मारल्यानंतर भारताचा रूद्रावतार आता पाकला सहन करावा लागत आहे. त्यात भारताने पाकचे पाणी बंद केले आहे तसेच हवाई हद्द बंद केली आहे.

पाकची डबधाईला आलेली अर्थव्यवस्था आणखीच गर्तेत गेली आहे आणि तसेच व्हावे अशी भारतवासीयांची इच्छा आहे. सिंधू जलकरार स्थगित केल्यानंतर आपल्याकडील काही लोक त्याला हलक्यात घेत आहेत, पण पाकिस्तानी जनता त्याचे भीषण परिणाम समजून चुकली आहे. जागतिक बँकेचा ताजा अहवाल असे सांगतो की २०२५ च्या शेवटपर्यंत पाकिस्तानचे ७४ टक्के लोक उपासमारीने मरू शकतात. पाण्याची कमतरता ही स्थिती आणखी बिघडवू शकते. पहलगाम हल्ल्यानंतर पाकची आधीच डळमळती अर्थव्यवस्था आणखीच कंगाल झाली आहे. आता जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याची शक्यता नाही, चीन-पाकला मदत करू शकणार नाही अशी स्थिती आहे, कारण चीनचे स्वतःचे प्रश्न आहेत. कर्ज, चलन फुगवटा आणि आंतरिक अस्थिरतेशी झुंजणाऱ्या पाकला नवे संकट पेलवणार नाही. पाकच्या जनजीवनावर त्याचा गंभीर परिणाम होणार आहे. युद्धसदृष्य परिस्थिती उद्‌भवते, तर पाकची अवस्था आणखीच अवघड होणार आहे. कारण आता युद्ध झाले तर पाकला ते परवडणार नाही. पहलगाम हल्ल्यानंतर भारताची स्थिती काही काळ चिंताजनक होती. पण पाक तर पुरता उद्‌ध्वस्त झाला आहे. पाक आपल्याच जाळ्यात गुंतला गेला आहे आणि त्याला कोणीही वाचवू शकणार नाही अशी स्थिती आहे.

# मंत्रिमंडळाच्या आयपीएलमध्ये फडणवीसांची बाजी



महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या दिनी अर्थात एक मे रोजी राज्यातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या महायुतीच्या सरकारचा शंभर दिवसांच्या कामगिरीचा मूल्यमापन करणारा निकाल जाहीर झाला आणि राज्य सरकारच्या या निकालाने आगामी भविष्यकाळात राज्यातील महायुती सरकार नेमके कोणत्या दिशेने वाटचाल करणार आहे त्या विकासाच्या वाटचालीची दिशा देखील या शंभर दिवसांच्या निकालाने अत्यंत स्पष्ट झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची जर आजवरची संसदीय कामकाजातील ज्येष्ठता आणि अनुभव लक्षात घेतला, तर या तिघांकडे ज्या खात्यांचा निकाल हा अपेक्षेपेक्षा कमी आला आहे तो निकाल भरून काढायला या तिघाही ज्येष्ठ आणि अभ्यासू नेत्यांना फारसा काही वेळ लागेल असे समजण्याचे कारण नाही. त्यामुळे शंभर दिवसांची ही महाराष्ट्र मंत्रिमंडळाची कामगिरी दाखवणारी आयपीएल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजी मारत पटकावली आहे, असे म्हटले तर कोणाला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत मूल्यमापनाचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे असलेल्या महिला व बालविकास विभागाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यात तत्कालीन महिला व बालकल्याण विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या खात्याचा सिंहाचा वाटा होता हे मान्य केले पाहिजे. मंत्रिमंडळाच्या स्तरावर आणि पक्ष संघटनेमध्ये दोन्ही जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडणारे जे हाताच्या बोटावर मोजता येतील असे महाराष्ट्रात मंत्री आहेत. त्यामध्ये एक आदिती तटकरे आणि दुसरे म्हणजे राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे आणि त्याचबरोबर शिवेंद्रराजे भोसले या तरुण आणि तडफदार मंत्र्यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. मंत्री नितेश राणे यांनी देखील मत्स्य व्यवसाय आणि बंदरे या खात्यांमध्ये गेल्या शंभर दिवसांत जो कामांचा सपाटा लावला आहे, त्याचा वेग आणि त्यांच्यातील कामाची ऊर्जा हे निश्चितच प्रशंसनीय आहे. त्यातील सर्वात मोठा निर्णय म्हणजे राज्यातील मत्स्य व्यवसायाला राज्य सरकारने नुकताच दिलेला कृषीचा दर्जा हा आहे. मंत्री नितेश राणे यांच्या केवळ या एका निर्णयाने महाराष्ट्रातील मच्छीमार करणाऱ्या कोळी बांधवांना शेतकऱ्यांप्रमाणेच यापुढे सर्व सरकारी लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार आहेत. मंत्री नितेश राणे यांनी ज्याप्रमाणे राज्याचा मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री म्हणून राज्य मंत्रिमंडळाच्या कामकाजात स्वतःचा ठसा उमटवला आहे त्याचबरोबर कोकणातील आणि विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाजपाची पक्ष संघटना ही अधिकाधिक कशी बळकट होईल याकडे देखील त्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये कटाक्षाने लक्ष दिले आहे. भाजपाच्या कडवट हिंदुत्ववादी विचारांचा आक्रमक आणि आश्वासक तरुण चेहरा ही मंत्री नितेश राणे यांची ओळख बनली आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याला पहिल्या टॉप फाईव्ह मध्ये आणण्यात मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे योगदानही महत्त्वपूर्ण ठरले आहे. तसेच या पहिल्या अव्वल पाच क्रमांकातील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे ही दोन नावेदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ज्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर न्यायालयाने दिलेल्या निर्देशांमुळे विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती त्या माणिकराव कोकाटे यांच्या कृषी खात्याने मात्र शंभर दिवसांच्या या कार्यक्रमात पहिल्या पाच अव्वल खात्यांमध्ये क्रमांक मिळवून विरोधकांच्या आरोपांमधली हवाच काढून टाकली. राज्याचे परिवहन मंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे शहरातील शिवसेनेचेच कॅबिनेट मंत्री असलेले प्रताप सरनाईक यांच्या परिवहन खात्याने देखील पहिल्या पाच क्रमांकामध्ये स्थान पटकावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असतील. ज्या परिवहन खात्याकडे एसटी कर्मचाऱ्यांचे पूर्ण पगार देण्यासाठी देखील पैसे नव्हते आणि त्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना सर्व राज शिष्टाचार बाजूला सारत मंत्रालयातील परिवहन विभागाचे प्रधान सचिव जे कोणी एकेकाळी ठाणे महापालिकेचे आयुक्त देखील होते त्या संजय सिटी यांच्या दालनात जावे लागले त्या परिवहन खात्याला प्रताप सरनाईक यांनी पहिल्या शंभर दिवसांतच अव्वल ५ खात्यांमध्ये आणण्याची जी किमया केली आहे. ती खरोखरच कौतुकास्पद आहे. भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) मार्फत या मोहिमेचे मूल्यांकन करण्यात आले. वेबसाईट कार्यक्षमता, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा दहा निकषांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की , 'ही मोहीम म्हणजे केवळ व्यवस्थापन नाही, तर उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि लोकहितासाठी कार्यक्षम प्रशासनाचे प्रतिबिंब आहे. या उत्कृष्ट अधिकाऱ्यांनी इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे. ' शासनाच्या सर्व ४८ विभागांनी १०० दिवसांचा धोरणात्मक बाबींचा कार्यक्रम हाती घेऊन महत्त्वाची नवीन धोरणे, दूरगामी निर्णय व लोकाभिमुख उपक्रमांची आखणी सुरू केली. गेल्या १०० दिवसांत या सर्व विभागांनी निश्चित केलेल्या ९०२ धोरणात्मक उद्दिष्टांपैकी ७०६ उद्दिष्टे (७८%) पूर्णतः साध्य केली आहे तर उर्वरित १९६ उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत संबंधित विभाग आपले काम चालूच ठेवतील. ९०२ पैकी ७०६ उद्दिष्टे गाठणे हे काही थोडेथोडके नक्कीच नाही. एकूण ४८ विभागांपैकी १२ विभागांनी आपली १००% उद्दिष्ट पूर्तता केली आहे, तर आणखी १८ विभागांनी ८०% पेक्षा जास्त उद्दिष्टे साध्य केली आहेत. असे हे जिल्हानिहाय, विभागनिहाय आणि खातेनिहाय निकाल आहेत. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडील ऊर्जा खाते, गृह खाते आणि त्याचबरोबर सामान्य प्रशासन विभाग यांचा याबाबतीतील निकाल हा अन्य खात्यांच्या तुलनेत निश्चितच कमी आहे. तीच स्थिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडील गृहनिर्माण आणि नगरविकास खात्याचे आहे. दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडील उत्पादन शुल्क खात्याची कामगिरी देखील या तुलनेत समाधानकारक नाही अशी आकडेवारी सांगते. अर्थात असे जरी असले तरी देखील हे लक्षात घेतले पाहिजे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचे या अत्यंत कठीण आणि प्रतिकूल राजकीय परिस्थितीत तब्बल तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. हे तीनही मातब्बर आणि प्रशासनाचा दांडगा अनुभव असलेले नेते त्यांच्या खात्यातील कमतरता झपाट्याने भरून काढतील याबाबत शंका घेण्याचे कारणच नाही. शक्तिपीठ महामार्गाचे काम राज्यातील महायुती सरकारने युद्धपातळीवर हाती घेतले आहे. महानगरांमधील मेट्रो आणि मोनो रेलच्या कामांना गतिमानता आली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा भार जरी राज्य सरकारच्या तिजोरीवर पडत असला तरी देखील ज्या लाडक्या बहिणींनी भरघोस मतदान करून महायुतीला पुन्हा प्रचंड बहुमताने सत्तेवर आणले त्या लाडक्या बहिणींसाठी ही योजना सुरू आहे. मुख्यमंत्री विज बिल सवलतीमुळे राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीज बिल शून्य येत आहे. आर्थिक अडचणीच्या काळातही महायुती सरकारने या लोकप्रिय योजनांना कोणतीही कात्री लावलेली नाही हे देखील लक्षात घेतले पाहिजे. नुकतीच मुंबईत महाराष्ट्राला डिजिटल टेक्नॉलॉजीमध्ये जगात नेतृत्व करण्याची संधी देणारी ' वेव्वज ' ही जागतिक पातळीवरील आंतरराष्ट्रीय परिषद मुंबईत सुरू आहे आणि त्यामुळे डिजिटल टेक्नॉलॉजीमध्ये त्याचबरोबर डिजिटल कंटेंटमध्ये आणि डिजिटल क्रिएटर्समध्ये महाराष्ट्र आणि भारत हा जगात नेतृत्व करू शकेल अशी क्षमता असणारा देश आहे हा विश्वास या परिषदेच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारने जागतिक व्यासपीठावर दाखवला आहे. त्यामुळे महाराष्ट्र मंत्रिमंडळाची ही शंभर दिवसांची आयपीएल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने बाजी मारत पटकावली आहे असं म्हटलं तर कोणाला आश्चर्य वाटू नये.

महाराष्ट्रनामा

**- सुनील जावडेकर**

# वाढत्या तोट्यावर बस भाडेवाढीचा उतारा

गेले अनेक आठवडे या स्तंभात बेस्टवरील वाढता तोटा व त्याची कारणे यांचा ऊहापोह होत असतानाच वाढत्या तोट्यावर उतारा म्हणून अखेर बेस्टने बस प्रवाशांवर भाडेवाढ लादलीच. ही भाडेवाढ जशी अपरिहार्य होती तसेच बेस्टला या भाडेवाढीमुळे थोडेफार सावरायला तरी मिळेल. मात्र भाडेवाड हा अखेरचा उपाय नव्हता. बऱ्याच गोष्टींवर बेस्टने नियंत्रण मिळवले असते वेळीच उपाययोजना केली असती, तर ही बेस्ट बस भाडेवाढ टळली असती. मात्र गेल्या आठवड्यात मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या बैठकीत बेस्टने बस भाडेवाढीची मागणी केली होती तसा प्रस्तावही दिला होता. मुंबई महानगरपालिकेने कोणताही विचार न करता भाडेवाडीस मान्यता दिली. आता राज्य वाहतूक नियमकाकडून परवानगी मिळाल्यानंतर येत्या एक दोन दिवसात ही बस भाडेवाढ लागूही होईल. तसे पाहायला गेले तरी दरवाढ अटळ होती व कधी ना कधी होणारच होती. याने बेस्टला थोडेफार सावरता येईलही मात्र कायमस्वरूपी उभे राहता येणार नाही हे ही खरे. मात्र ही भाडेवाढ पाहिल्यास दुप्पट असून, सध्याच्या तिकिटापेक्षा ७० ते ८० टक्के जास्त आहे. मात्र याच्या परिणामांचाही फेरविचार करण्याची गरज येणाऱ्या काळात करावी लागेल. सध्या वातानुकुलीत बसचे असलेले भाडे सहा रुपयांवरून थेट १२ रुपये म्हणजे दुप्पट होणार आहे तर साध्या बसचे भाडे पाच रुपयाचे १० रुपये होणार आहे. वातानुकूलित बसचे भाडे १३ रुपयावरून थेट वीस रुपये होणार असून साध्या बसेस पंधरा रुपयावरून वीस रुपये होईल. मात्र सध्या साध्या बस गाड्यांची संख्या खूपच मर्यादित असल्याने व वातानुकूलित बस गाड्यांची संख्या जास्त असल्याकारणाने वातानुकूलित बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसणार आहे. याच दरात इतकेच काय तर याच्या पेक्षाही कमी दरात शेअर रिक्षा शेअर टॅक्सीचा पर्याय उपलब्ध झाल्यास बेस्टचे बस प्रवासी मोठ्या प्रमाणात कमी होतील.

आतापर्यंत स्वस्त दरात बस सेवा मिळत होती तिथे प्रवासी रांग लावून बस प्रवास करत होता. तिथे तो आता आपसुकच शेअर टॅक्सी व शेयर रिक्षाला रांग लावेल. मुंबईत लवकरच काही मेट्रो मार्ग सुरू होत आहेत, त्याचा ही फटका बेस्टला बसेल. सध्या बस गाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमतरता असल्याने वेळेवर न येणाऱ्या बस गाड्या हे पाहून स्वतःची खाजगी वाहने विकत घेणाऱ्यांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढेल व मुंबईत पुन्हा वाहतूककोंडी सारखी स्थिती दिसली तर नवल वाटणार नाही. वास्तविक पाहता त्याकाळी बस भाडेवाढ कमी करण्याचा मुंबई महानगरपालिकेचा उद्देशच लोकांनी आपल्या स्वतःच्या गाड्या घरी ठेवाव्यात व सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करावा हा होता. मात्र पालिकेचा उद्देश हा असफल ठरला असून बेस्ट दर कमी केल्याने बेस्ट मात्र तोट्याच्या खड्ड्यात नकळतपणे अडकली मग याची जबाबदारी कोण घेणार हे आता ठरवण्याची वेळ दिली आहे. बेस्टला आर्थिक गरतेतून बाहेर काढण्यासाठी तिकिटांची दरवाढ करणे अपरिहार्य आहे. सध्या बेस्टचा बस ताफा हा २७००वर आला असून भाडेतत्त्वावरील बस गाड्यांची संख्या सध्या मोठी आहे. बेस्टने उत्पन्न वाढीसाठी मिडी बस, मिनी बस गाड्या, टेम्पो अशा नवीन प्रकाराच्या बस गाड्या भाडेतत्त्वावर घेतल्या. कंत्राटांमधील काही गोष्टी बेस्ट ने गांभीर्याने न घेतल्याने कर्मचारी वर्ग न टिकल्याने तीन कंत्राटदारांनी अचानक बेस्ट मधून काढता पाय घेतला. त्यामुळे भाडेतत्त्वावरील बस गाड्यांवर अवलंबून असलेल्या बेस्टला मोठा झटका बसला व बस सेवा ठप्प झाल्या. अचानक झालेल्या या बस कपातीमुळे बेस्ट पासून प्रवासी वर्ग दुरावला व ४३ लाख असलेली प्रवाशांची संख्या थेट ३४ लाखांवर घसरली त्यात आता सध्याच्या बस गाड्या भंगारात निघाल्याने व कंत्राटदाराच्या मोठ्या बस वेळेत न आल्याने बेस्टची संख्या दिवसेंदिवस कमी होत गेली आणि प्रवाशांनी मग भलेही स्वस्त बस प्रवास असला तरी बेस्ट प्रवासाला रामराम ठोकला. सध्याच्या होणाऱ्या बस भाडेवाडीमध्ये वातानुकूलित बसचे भाडे हे १३ रुपये २० रुपये ३० रुपये ४० रुपये असे आहेत. त्यात कंत्राटदारांनी बस गाड्यांची देखभाल न केल्याने बंद पडलेली वातानुकूलित यंत्रणा ही प्रवाशांसाठी सध्या मोठी डोकेदुखी बनली आहे.



महापालिकेने यंदा ७४,४२७ हजार कोटींचा अर्थसंकल्प सादर केला त्यात बेस्टला मात्र वार्षिक तोटा फक्त १५०० कोटी आहे, तो जर पालिका प्रशासनाने दिला असता तर बेस्ट भाडे वाढ ही नक्कीच टळली असती. मात्र हे देखील खरे आहे की आता बेस्टला फक्त कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी ही दरवाढ करायची आहे. कारण ज्या प्रमाणात बेस्टच्या कंत्राटदारांच्या बस सेवा बेस्ट उपक्रमात दाखल होत आहे त्यामुळे बेस्टचा दैनंदिन खर्चही वाढत चालला आहे. गेली तीन ते चार वर्ष बेस्टकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. या दरवाढीने बेस्टचे असलेले उत्पन्न ८४५कोटी आहे. मात्र बस भाडेवाढीनंतर ते १४०० कोटी होईल. मात्र या ६०० कोटींसाठी ३४ लाख मुंबईकर प्रवाशांना वेठीस धरले जाणार आहे. त्यामुळेही जर बेस्ट बस दरवाढ झाली आणि काही महिन्यात मुंबई महापालिकेच्या निवडणुका आल्या, तर मात्र या दरवाढीचा परिणाम त्या निकालावर काही प्रमाणात तरी लागू शकेल यात शंका नाही!

**- अल्पेश म्हात्रे**

## राशिभविष्य

सोमवार,५ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख शुद्ध अष्टमी शके १९४७. चंद्र नक्षत्र आश्लेषा. योग वृद्धी, चंद्र राशी कर्क, भारतीय सौर १५ वैशाख शके १९४७ म्हणजेच सोमवार, दिनांक ५ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०८, मुंबईचा सूर्यास्त ७.०२, मुंबईचा चंद्रोदय १.०९, मुंबईचा चंद्रास्त १२.१४, राहू काळ ७.४५ ते ९.२१ दुर्गाष्टमी, सीता नवमी, शुभ दिवस

### ॥ भविष्य ॥

**मेष** : नवीन उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा होईल.

**वृषभ** : नोकरीमध्ये वातावरण चांगले राहील.

**मिथुन** : कौटुंबिक सुख लाभून जोडीदाराशी चांगले संवाद होतील.

**कर्क** : व्यवसाय-धंद्यात आवश्यक फेरबदल करावे लागतील.

**सिंह** : मानसन्मान मिळवून अर्थार्जन होईल.

**कन्या** : आत्मविश्वास टिकवून ठेवा.

**तूळ** : मित्रमंडळींच्या सहवासात आजचा दिवस आनंदी राहील.

**वृश्चिक** : एखादे महत्त्वाचे काम झाल्यामुळे दिवस समाधानात जाईल.

**धनू** : काही मनाविरुद्ध निर्णय स्वीकारावे लागतील.

**मकर** : आवडत्या व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कुंभ** : कौटुंबिक सुख मिळेल

**मीन** : सुखद वार्ता मिळतील.

जनसंवाद

### मुलांच्या आवडीनुसार प्रवेश देणे गरजेचे

दहावीचे निकाल लागताच प्रत्येक विद्यार्थ्यांचे पालक पुढील शिक्षणाचे ध्येय मनामध्ये बाळगले असतील मात्र आपल्या मुलांचे पुढील शिक्षणाबद्दल मत विचारात घेणे सद्या गरजेचे बनले आहे मुलांचे प्रत्येक आई-वडील, पालक बळजबरीने आपल्या मुलांना आवडीनुसार मुलांना शिक्षण घेण्यास सांगतात. मुलांचीही आवड, निवड, इच्छा,पसंती असते त्यानुसारच पुढील शालेय शिक्षण घेण्यास सांगावे तरच खऱ्या अर्थाने त्यांची प्रगती होईल. आज बऱ्याच मुलांचे आई-वडील बळजबरीने आपल्या इच्छेनुसार शिक्षण घेण्यास मुलांना सांगत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुलांना आपल्या आवडीनुसार शिक्षण घेता येत नसल्याने अनेकजण निरुत्साही होऊन आत्महत्येसारखा मार्ग निवडतात तर काहीजण आई-वडिलांना विश्वासात घेत नसल्याचे दिसून येते. शैक्षणिक क्षेत्रामध्ये मुलांना स्वतंत्र दिले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने त्यांची प्रगती होऊन बौद्धिक क्षमता वाढेल म्हणूनच मुलांच्या आवडीनुसार पुढील शिक्षण देऊन त्यांचा चौफेर विकास साधणे गरजेचे आहे.

– **राजू जाधव,** मांगूर जि.बेळगाव

### दहशतवादाचे पडसाद इथे पसरू नये

काश्मीरमधील पहलगाम दहशतवादांच्या हल्ल्याचे पडसाद देशभरात नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले. २६ भारतीयांची निर्घृण हत्या करण्यात आली त्यात महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. पर्यटनासाठी गेलेल्यांचा धर्म कोणता हे विचारून हल्लेखोरांनी मारले हे जरा अतीच झाले असे म्हणावे लागेल. पर्यटनात सर्व धर्मांचे पर्यटक असतात. हिंदू आहेत त्यांनाच मारा याचा अर्थ हे दोन धर्मात युद्ध पेटवण्याचे कारस्थान आहे. सर्व धर्मातील लोकांनी दहशतवादाविरुद्ध आवाज उठवून एकसंघ भारत राखणे आवश्यक आहे. खोट्याचा प्रसार लवकर होतो. सत्य कळायला उशीर होतो. देशातील धर्म युद्ध परवडणारे नाही हेच खरे.

– **महादेव गोळवसकर,** कुर्ला

### मनोरंजनक्षेत्रात बेरोजगारी का?

भारतातील चित्रपट, टेलिव्हिजन आणि ऑनलाइन व्हीडिओ सेवाक्षेत्र हे केवळ मनोरंजन करणारे माध्यम नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक भक्कम आधार झाले आहे. मोशन पिक्चर असोसिएशन आणि डेलॉइट यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या अहवालानुसार २०२४ मध्ये मनोरंजन क्षेत्राने तब्बल २०.६४ लाख रोजगार तयार केले. भारतीय मनोरंजनक्षेत्राची ताकद वाढल्याने देशाच्या आर्थिक बाजूही बळकट होईल. मनोरंजन क्षेत्रातील क्रांतीने बेरोजगारी कमी होईल का?

– **विवेक तवटे,** कळवा

### आर्थिक कोंडी

पहलगाममध्ये अतिरेकी हल्यानंतर पुन्हा तीच परिस्थिती तेच राजकारण हल्ला झाला कसा? अतिरेकी आले कसे ? आणि गेले कोठे ? यावेळी तर धर्म विचारून फक्त पुरुषांना मारले आणि आणि स्वतःच्या धर्माचे कलमा म्हणावयास सांगितले धर्माच्या घोषणा करावयास सांगितले हे अतिरेकी हिंदुस्थानात येतात तेव्हा हिंदुस्थानातील त्याच्याच धर्माच्या लोकांच्या आश्रयाला राहतात आणि मग हिंदुस्थानातील हिंदूवर अतिरेकी कारवाया करतात आणि आपण काळ्यापट्या, मेणबत्त्या लावून निषेध करत बसतो एकूण हिंदुस्थानातील आश्रयदात्याचे कंबरडे मोडणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आर्थिक बहिष्कार मार्ग आहे.

– **मयूर ढोलम,** जोगेश्वरी

### टँकर मुक्ती हवी

पाण्यासाठी ग्रामीण भागातील महिला कित्येक किलोमीटर पायपीट करून पाणी आणतात. सरकारच्या पाणीपुरवठा खात्याकडून दरवर्षी पाणी टंचाई असलेल्या वाड्या, गाव यांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात येते. पाणीटंचाई ग्रस्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येईल. संपली जबाबदारी प्रति टँकर पाण्याचा खर्च काढून सरकारच्या संबंधित विभागाकडे सादर केल्यानंतर पुढील सोपस्कार पूर्ण होतात. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी उपयोगात आणण्यासाठी सरकारच साठवण टाक्या का बांधत नाही. महाराष्ट्रातील सर्व विभागांपेक्षा कोकण विभागात सर्वाधिक पाऊस पडतो. पावसाचे पाणी समुद्राला जाऊन मिळते ते उपयोगात का आणले जात नाही. कोकणातील सर्व तालुक्यातील गावांची, वाड्यांची जानेवारीपासून पाण्यासाठी वणवण सुरू होते. ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेतून दररोज अर्धा तास कमी दाबाने पाणीपुरवठा करण्यात येतो. यात सुधारणा कधी?

– **एम. गोळवसकर,** मुंबई

### आम्ही यातच अडकलो

दहशतवाद्यांच्या हल्ल्यात २६ जीव हकनाक बळी पडून त्यांचे कुटुंबीय अजूनही सावरले नसतांना मीडिया आणि राजकीय नेत्यांनी भान सोडले आहे असे वाटते. कारण ताळतंत्र सोडून बातम्यांमध्ये युद्धाविषयी अवास्तव बातम्या देण्याचे धोरण ठरविल्याचे दिसते आणि नेते 'हम छोडेंगे नहीं' आणि बदला जरुर लेंगे' या पलीकडे जात नाही. आमच्या राज्यात 'मी पुन्हा येईन' पासून सुरू झालेला प्रवास 'मला मुख्यमंत्री व्हायचं' इथपर्यंत येऊन पोहोचत असतांना वाचाळवीर नेत्यांना आपल्या नेत्यांकडून आयता विषय मिळाला. खरं म्हणजे दहशतवादी हल्ला हा देशवासियांच्या दृष्टीने गंभीर असतांना नेत्यांनी आणि मीडियाने तारतम्य ठेवले पाहिजे.

– **अरुण बधान,** डोंबिवली

### भारत-पाक युद्धाचे ढग गडद

पहलगाम येथील पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलली. त्यानंतर भारताच्या आक्रमक भूमिकेचा पाकिस्तानने चांगलाच धसका घेतला आहे. परिणामी पाकिस्तानी लष्कराने सीमारेषेवर जवानांची संख्या वाढवली आहे. अशा परिस्थितीत गेल्या काही दिवसांपासून प्रसार माध्यमातून भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाचे ढग दाटून आल्याची चर्चा होत आहे. एकीकडे यूके, अमेरिका, रशिया, फ्रान्स इत्यादी देशांनी भारताला पाठींबा जाहीर केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानविरुद्धचा राग शिगेला पोहोचला. आता भारताने अधिक वाट न पाहता पाकिस्तानवर हल्ला करावा अशी संतापजनक प्रतिक्रिया अनेक भारतीय व्यक्त करत आहेत, तर तिकडे पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या नागरिकांना देखील युद्धाची भीती वाटत आहे. मात्र उसने अवसान आणून युद्धाच्या पोकळ धमक्या देणारा पाकिस्तान प्रत्यक्ष युद्ध पेटलेच, तर भारतापुढे बेचिराख झाल्याशिवाय राहणार नाही असे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे.

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

# 'रात्रीस चांदण्यांचे, सुचते सुरेल गाणे...'



नॉस्टॅल्जिया



**श्रीनिवास बेलसरे**

गदिमा, शांता शेळके, मधुकर जोशी, भा. रा. तांबे, सुरेश भट अशांच्या बरोबर मंगेश पाडगावकर म्हणजे मराठीतला आणखी एक चमत्कार! त्यांनी ज्या विषयावर कविता लिहिल्या आणि पुढे त्यांची अत्यंत लोकप्रिय गाणी झाली त्याची गणती नाही असेच म्हणावे लागेल. पाडगावकरांच्या कवितांचे विषय तरी किती?

**'अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी, लाख चुका असतील केल्या, केली पण प्रीती',**

**'हात तुझा हातातून धुंद ही हवा, रोजचाच चंद्र आज भासतो नवा'**

यासारखी हळवी प्रेमगीते किंवा 'जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली, झाली फुले कळ्यांची झाडे भरात आली.' आणि 'भेट तुझी माझी स्मरते, अजून त्या दिसाची, धुंद वादळाची होती रात्र पावसाची' सारखी धुंद प्रणयगीते, 'डोळ्यांमधले आसू पुसती ओठावरले गाणे.' 'शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलापरी', डोळ्यांत सांजवेळी आणू नकोस पाणी, त्या दूरच्या दिव्यांना सांगू नको कहाणी', आणि 'धुके दाटलेले उदास उदास, मला वेढिती हे तुझे सर्व भास...' सारखी भावूक विरहगीते लिहिणारे पाडगावकर कधी चक्क 'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल का' आणि 'पुस्तक नंतर वाचा, आता खेळा नाचा'सारखी बालगीतेही लिहीत,

बा. भ. बोरकरांच्या पंगतीला बसताना पाडगावकर 'श्रावणात घननिळा बरसला, रिमझिम रेशीम धारा'सारख्या अतिरम्य, चित्रमय निसर्गकविता लिहित, तर त्यांच्या 'अशी पाखरे येती' सारख्या गाण्यातसुद्धा आलेली आईच्या प्रेमाचा महिमा सांगणारी 'एक हात तो हळू थरथरला, पाठीवर मायेने फिरला, देवघरातील समयीमधूनी अजून जळती वाती...' ही त्यांची ओळ कुणालाही हळवे करून टाकते. हा कवी हे एक आगळेच मिश्रण होते. त्यांनी कोळीगीते लिहिली,

'भावभोळ्या भक्तीची ही एकतारी, भावनांचा तू भुकेला रे मुरारी',
'तिन्ही लोक आनंदाने भरून गाऊ दे रे, तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे रे.',

सारखी अस्सल भक्तीगीते लिहिली.

जीवनाबद्दल वेगळाच विचार मांडून काहीसे हलकेफुलके तत्त्वज्ञान देणाऱ्या 'दिवस तुझे हे फुलायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे' आणि 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे.' सारखी आशयघन प्रेरणादायी गाणी मंगेशजींचीच! त्यांनी लिहीलेली सर्वच विषयांवरची गाणी अप्रतिम ठरली आहेत.

जेव्हा समाज सुस्थिर होता, बहुतेक नैसर्गिक भावभावना निकोप असत, सामाजिक नितिमत्ता अबाधित होती त्यावेळच्या भावूक प्रेमिकांच्या कथा लिहाव्यात, तर पाडगावकरांनीच! होय 'कथा'! अगदी २/३ कडव्यांच्या कवितेतही हा माणूस एखादी संपूर्ण प्रेमकथा सांगून जायचा, तेही तिचे सगळे पदर कवेत घेऊन. याच नाजूक, हळव्या प्रेमकथांचा अंत अनेकदा विरहात, कायमच्या ताटातुटीत होणे जेव्हा सार्वत्रिक होते त्याकाळी त्यातून येणाऱ्या वेदनादायी विरहाचे दुःख, बोच, हुरहूर अत्यंत संयतपणे व्यक्त करावी तीही पाडगावकरांनीच!

प्रेमाच्या कथेची सुरुवात ते तिचा सुखद आणि अगदी दुःखद शेवट इथपर्यंत, कधी रोमँटिक, खेळकर सुरुवातीपासून ते समंजसपणे घेतलेल्या कायमच्या निरोपापर्यंतचे एकेक क्षण, भावनेच्या आंदोलनाचे एकेक पदर, पाडगावकर शब्दांच्या कॅमेऱ्याने टिपून रसिकांपुढे जणू एक अल्बमच ठेवत असत.

त्यांचे असेच एक भावगीत खूप लोकप्रिय आहे. उर्दू शायरीत जशा प्रेमिकांच्या मनातल्या नाजूक लहरी, त्यांच्या केवळ परस्परांनाच समजणाऱ्या लोभस अदा चित्रित होतात तसे त्यांच्या या गीतात दिसते. साधे तिचे लाजणे आणि सहजच सस्मितपणे कवीकडे पाहणे हाच पाडगावकरांनी कवितेचा विषय करून टाकला! प्रियेच्या एकेका हावभावाचा अर्थ ते काढतात. अर्थात तो त्यांना अनुकुल असाच निघणार. म्हणून ते पहिल्याच ओळीत म्हणतात -

**'लाजून हासणे अन् हासून हे पाहणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे.'**

जणू प्रिया लाजते तेही तिचे खरे लाजणे नाहीच आणि तिने कवीकडे हसून पाहिले तर तोही एक बहाणाच! मात्र कवीच्या मनात तिच्या या दोन्ही अदा काहूर माजवून ठेवतात. रात्री निद्रेच्या अधीन होताना तिचे रूप आठवण्यासाठी पापण्या उघड्या ठेवणे कवीला जड वाटू लागते आणि त्या मिटताच तिचा चंद्रासारखा विलोभनीय चेहरा डोळ्यांसमोर येतो. हे सगळे स्वप्नवत अवस्थेतच का शक्य होते, तिची प्रत्यक्ष भेट का होत नाही? ती समोर असताना असे का घडत नाही अशा जीवघेण्या प्रश्नाची उत्तरे मला सापडत नाहीत अशी कवीची तक्रार आहे.

**'डोळ्यांस पापण्यांचा का सांग भार व्हावा?**
**मिटताच पापण्या अन् का चंद्रही दिसावा?**

हे प्रश्न जीवघेणे हरती जिथे शहाणे,
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे.'

मग कवी आपले खरे दुःख सांगतो. तो म्हणतो, 'प्रिये, तुझ्या धनुष्याकार पापण्या फार घातक आहेत. तिथूनच तर माझ्यावर बाणांचा वर्षाव होत असतो. असे धनुष्य तुझ्याकडे आहेत त्यात तुला आमची दुःखे कशी कळणार? ज्याच्या हृदयात तुझ्या नजरेचे बाण शिरतात, रुतून बसतात ना, त्यांनाच ते कळू शकते! तू चोरून टाकलेला एखादा कटाक्षही किती घायाळ करून जातो ते तुला कसे कळणार?

**'हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे? हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे!**
**तिरपा कटाक्ष भोळा, आम्ही इथे दिवाणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे.'**

ती अभावितपणे नुसती समोरून गेली तरी प्रियकराला शुक्रासारखा एखादा तेजस्वी तारा उगवल्याचा भास होतो. जणू फुलांच्या देशातून सुंगधी वाऱ्याची झुळूक यावी तसे तिचे येणे आणि जाणे असते. तिच्या दर्शनाने भर उन्हातसुद्धा चांदणे पडल्यासारखे वाटू लागते. गाणी सुचू लागतात.

**'जाता समोरुनी तू उगवे टपोर तारा, देशातूनी फुलांच्या आणि सुगंध वारा.**
**रात्रीस चांदण्याचे सुचते सुरेल गाणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे.'**

तारुण्यातील प्रेमाच्या, प्रियाराधनाच्या किती नाजूक अस्पष्ट छटासुद्धा हा कवी टिपतो ते पाहिले की पुन्हा मागे जावून ती धुंदी, तो वेडेपणा, ते हरवलेपण, प्रसंगी अगदी ती दुःखेसुद्धा अनुभवावी असे वाटू लागते. आपल्याबरोबर रसिकाला त्याच मनस्थितीत केव्हाही कुठेही घेऊन जाऊ शकण्याचे सामर्थ्य अशा सिद्धहस्त कवींच्याजवळच असते. त्यांचे शब्द एखाद्या संमोहन-तज्ज्ञासारखे रसिकांवर जादू करतात, मोहिनी टाकतात आणि घटकाभर का होईना काळावर विजय मिळवून तारुण्यातील धुंदीच्या पुनःप्रत्ययाचा आनंद देतात. म्हणून तर हा नॉस्टॅल्जिया!

# भारत माझा देश आहे



नक्षत्रांचे देणे



**डॉ. विजया वाड**

आपल्या देशाबद्दल स्वाभिमान जागृत व्हावाच अशी सध्याची वेळ आहे. आपल्या पाठ्यपुस्तकात, 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशाचा मला अभिमान आहे.' अशा अर्थाची प्रतिज्ञा छापलेली असते पण दस्तावेज किती तरुण दिलांवर उमटतो? माझे पती आई-वडिलांचे एकुलते अपत्य! पण तरी ते इंडियन आर्मीत शॉर्ट सर्व्हिस कमिशनवर होते. राष्ट्रपतीच्या रक्षा मेडलचे मानकरी आहेत ते. १९६५ चे भारत-पाक युद्ध लढले आहेत या सर्व गोष्टी मला सार्थ अभिमान आहे.

मी आयुष्यभर शिक्षिका म्हणून नोकरी केली. शिक्षिका, पर्यवेक्षिका, मुख्याध्यापिका, संचालिका ही सर्व पदे भूषविली. पण तसे करताना एक तास रोज 'देशाभिमान' या विषयाशी निगडित असे. त्यामुळे माझे कितीतरी विद्यार्थी भारतीय सैन्य दलात गेले. अगदी डॉक्टर, इंजिनीअर होऊन सुद्धा! त्यांना मी एक गीत नेहमी शिकवीत असे. ते असे...

'मी भारतीय आहे
मज सार्थ गर्व आहे
माझ्याच भारताचे
मी एक बीज आहे ! ।।१।।
'काळीच' आई माझी
मजला अतिव प्यारी
तव प्राण रक्षिण्याला
मम जीव हा करारी
।।२।।
'गे मायभू तुलाही
अर्पीन भावमाला
माझ्या पवित्र हाते
माझा प्रणाम
तुजला' ।।३।।

माझा प्रत्येक विद्यार्थी भारत प्रेमी व्हावा ही माझी मनोमन इच्छा असे. त्यातून काही विद्यार्थी लष्करात गेले नि मला नमस्कार करायला आले, की माझे मन नि डोळे भरून येत. त्यांना जवळ घेताना, मायेने थोपटताना, काळजाचा ठोका चुके. पण भारतप्रेम आपण जुन्या पिढीकडून तरुणाईकडे सोपवीत आहोत याचा अभिमान वाटे.

एक दिवस माझा उदयांचलचा विद्यार्थी संपूर्ण लष्करी वेषात माझ्या समोर आला.

"टीचर, मी आदिल. १९९९ ची बॅच! आठवतं का? एनसीसीचा कोस्ट कॅडेट म्हणून तुम्ही माझ्या युनिफॉर्मवर बिल्ला लावला होता.."

"हो हो आदिल ! आठवते ना!" मी म्हटले.

"तेव्हाच ठरविले होते. भारतीय सैन्यात जायचे."

"किती छान."

"माझे सिलेक्शन झालेय."

"अरे वा ! अभिनंदन आदिल!" मी आनंदले.

"तुम्ही माझ्या आवडत्या शिक्षिका."

"मला ते ठाऊक आहे आदिल."

"म्हणून तुम्हाला शोधत आलो. मला समजले की उदयांचल सोडून तुम्ही प्रमोशनवर पोदार स्कूलमध्ये आलात. मग तडक विक्रोळीहून सांताक्रूझला या शाळेत आलो."

"खूप छान केलंस."

"मी त्याला आग्रहाने बसविले. चहा नि वडा खायला दिला तो त्यानं आवडीने खाल्ला.

"टीचर, माझं पोस्टींग सियाचेनला झाले आहे."

"अरे बापरे!" मी घाबरले.

"तो तर डेंजरस आहे ना रे आदिल?"

"अहो सैन्य म्हणजेच धोका ! फार काय होईल? मी शहीद होईन!"

"असे नको रे बोलूस."

"का टीचर?"

"माझे मन थरकते ! घाबरे होते. मुझे डर लगता है !"

"घाबरू नका टीचर."

माझे भरून आलेले डोळे आदिलने मायेने पुसले "हम होंगे कामयाब एक दिन ! हां. हां मनमें है विश्वास! हम होंगे कामयाब एक दिन." त्याने गात गात मला विश्वास दिला.

"टीचर, एक दिवस विजयी सैनिक म्हणून तुम्हाला भेटायला येईन. तोवर आशीर्वाद द्या."

"तो वाकला मी आनंदाने रडत रडत म्हणाले, "विजयी भव ! विजयी भव ! भारत माताकी जय ! अखंड भारताचा विजय असो !"



# सर्वेपि सुखिनः सन्तु



संवाद



**गुरुनाथ तेंडुलकर**

एका शाळेत घडलेली ही गोष्ट. मकरसंक्रांतीच्या आदल्या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकांनी दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना पटांगणात बोलावले, प्रत्येकाच्या हातात एक-एक फिरकी आणि मांजा दिला आणि म्हणाले, 'फिरकी, मांजा तुमच्या दप्तरात ठेवा आणि पहिल्या मजल्यावरच्या हॉलमध्ये जा. तिथे हॉलमध्ये भिंतीवर पतंग टांगलेले आहेत. प्रत्येक पतंगावर प्रत्येक विद्यार्थ्याचे पूर्ण नाव आणि रोल नंबर लिहिलेला आहे. आपण सर्वांनी आत जाऊन आपापले नाव असलेला पतंग घेऊन घरी जाऊन उडवायचा आहे. चला तर करा सुरुवात.'

मुख्याध्यापकांनी एवढं बोलताच सर्व विद्यार्थी हॉलच्या दिशेने धावले. हॉलमध्ये एकच गर्दी उसळली. प्रत्येकजण आपापल्या नावाचा पतंग शोधू लागला. इतरांच्या नावाचे पतंग मुलांनी दूर सारायला सुरुवात केली. त्या धांधल-गडबडीत अनेक पतंग फाटले. ज्यांना आपल्या नावाचा पतंग फाटलाय हे समजले त्यापैकी काहींनी रागाने इतरांचे पतंग फाडले. त्यामुळे तिथे मारामारी सुरू झाली. आरडाओरडा आणि कोलाहलात काही अर्वाच्य शिव्यादेखील मिसळल्या आणि परिणामी... परिणामी एकाही विद्यार्थ्याला आपल्या नावाचा पतंग धडपणे बाहेर आणणे शक्य झाले नाही. सगळ्यांचेच पतंग फाटले होते.

वेळ संपल्यानंतर मुख्याध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा पटांगणात बोलावून बसायला सांगितले. तिथे भयाण शांतता पसरली होती. एकाही विद्यार्थ्याला मुख्याध्यापकांच्या नजरेला नजर देणं शक्य होत नव्हते; परंतु मुख्याध्यापक समजूतदार होते. त्यांनी सौम्य शब्दात मुलांशी पुन्हा संवाद साधायला सुरुवात केली आणि म्हणाले, 'जे झालं ते झालं. आता हाच खेळ आपल्याला पुन्हा नव्याने खेळायचा आहे. शाळेच्या दुसऱ्या मजल्यावरच्या हॉलमध्ये तशाच प्रकारे तुमच्या प्रत्येकाच्या नावाचे पतंग भिंतीवर टांगून ठेवलेले आहेत. तुम्ही आत जाऊन पहिल्यासारखेच आपापल्या नावाचा पतंग घेऊन बाहेर यायचे आहे. पण यावेळी खेळाचा नियम थोडा बदललेला आहे. प्रत्येकाने एक-एक पतंग काढून तो ज्याच्या नावाचा आहे त्या विद्यार्थ्याला द्यायचा आहे. समजले.'

विद्यार्थी पुन्हा दुसऱ्या मजल्यावर धावले. हॉलमध्ये शिरले. पण यावेळी त्यांच्यात एक शिस्त होती. एकेक विद्यार्थी एक एक पतंग घेऊन, सांभाळून, त्यावर ज्याचं नाव आहे त्या मुलाला शोधून त्याच्या हातात देऊ लागला. हां हां म्हणता, प्रत्येक विद्यार्थ्याला आपापल्या नावाचा पतंग सापडत गेला. बाहेर पडताना सगळ्या विद्यार्थ्यांच्या हातात स्वतःच्या नावाचे पतंग होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद होता.

मुख्याध्यापकांनी पटांगणात पुन्हा सगळ्या विद्यार्थ्यांना बोलावून त्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले अन् म्हणाले, 'तुम्ही यंदा दहावीत आहात. पुढच्या वर्षी तुम्ही शाळेतून कॉलेजमध्ये जाणार, त्यानंतर एका आगळ्या-वेगळ्या जगात प्रवेश करणार आहात. ते जग तुमच्यासाठी खूपच अनोळखी असेल. तिथे तुम्हाला अनेक प्रकारची अनेक माणसं भेटतील. काही चांगली, काही वाईट. अनेक अनुभवांना तुम्ही सामोरे जाल... पण एक गोष्ट लक्षात ठेवा. तुम्हाला प्रत्येकाला जर आनंद हवा असेल, तर त्यासाठी तुम्ही केवळ स्वतःचा आनंद शोधू नका. इतरांना आनंद देण्याचा प्रयत्न केलात, तर आपोआपच इतरांकडून तुम्हाला तुमचा आनंद सापडेल.'

आजच्या आधुनिक जगात वावरताना आपण पहातोय की, आपल्यापैकी प्रत्येकजण सुखाच्या मागे धडपडतोय. एका अदृष्य चक्रात गुरफटून भोवळ येईपर्यंत गरगरतोय. हे चक्र आहे स्पर्धेचे. या चक्रात सापडलेला प्रत्येकजण केवळ स्वतःच्या फायद्यासाठी धडपडतोय. मी आणि माझं कुटुंबीय एवढाच संकुचित विचार करून जगतोय. परिणामी... प्रत्येकाचाच पतंग फाटतोय...

बरं, केवळ मी आणि माझं ही वृत्ती आजचीच आहे असं नाही. अगदी प्राचीन काळातही अशी वृत्ती धारण करणारी माणसं होती. अगदी रामायण महाभारताच्या काळातही होतीच की... रामायणातील कैकयी हे त्याचं धडधडीत उदाहरण आहे. केवळ माझ्याच मुलाला राज्य मिळाले पाहिजे यासाठी प्रभू श्रीरामाला वनवासात पाठवणारी कैकयी आणि संपूर्ण विश्वावर केवळ माझीच सत्ता असायला हवी, मला जे हवं ते मी कोणत्याही मार्गाने मिळवणारच असा दंभ बाळगून सीतामाईला कपटाने पळवून नेणारा रावण...

महाभारतातही पांडवांचे न्यायहक्काने मिळालेले राज्य छल-कपट करून द्यूतात जिंकून त्यांना वनवासात पाठवणारा दुर्योधन-दुःशासन, शकुनी आणि त्यांचा पाठीराखा कर्ण ही चांडाळ चौकडी...

हस्तिनापूरच्या राज्यावर केवळ माझाच मुलगा दुर्योधन बसायला हवा या मोहाने ग्रासलेला जन्मांध तसंच कर्मांध धृतराष्ट्र आणि त्याला ठाम विरोध न करणारी त्याची पत्नी गांधारी...

इतिहासातही अशी अनेक उदाहरणं सांगता येतील. राघोबादादांची पत्नी आनंदीबाई 'ध चा मा करणारी' भर दरबारात नारायणरावाचा खून करवणारी आनंदीबाई...

मूठभर मोहरांसाठी फितुर होऊन शंभूराजांना मोगलांच्या स्वाधीन करणारा गणोजी शिर्के...

स्वतःचं राज्य टिकवण्यासाठी पृथ्वीराज चौहानच्या विरुद्ध कारस्थान करून त्याला महंमद घोरीच्या ताब्यात देणारा जयचंद राठोड...

मोगलांच्या इतिहासात तर अशा अनेक व्यक्ती सापडतात. औरंगजेबाच्या बाबतीत सांगायचं तर त्याने राजगादी मिळवण्यासाठी स्वतःच्या वडिलांना, शहाजहाँला मरेपर्यंत तुरुंगात डांबून ठेवले होते. स्वतःच्या सख्ख्या भावाचा दारा शुकोहचा खून केला होता.

१८५७ च्या भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात स्वतःच्या स्वार्थासाठी ब्रिटिशांना फितूर होणारा बहादूरशहा जाफर केवळ मी आणि माझं ही स्वार्थी वृत्ती आजचीच नाहीये. पण अलीकडे ती जरा अधिक प्रमाणात वाढलीय हे मात्र नक्की. त्यामागे अनेक कारणं आहेत. काही सामाजिक, काही राजकीय, काही आर्थिक...

राजकारणाबद्दल तर बोलायची सोयच उरली नाहीये. केवळ स्वतःला मुख्यमंत्रीपद हवं म्हणून निवडून देणाऱ्या जनतेशी आणि युती केलेल्या पक्षाशी बेईमानी केलेले नेते आपण पाहिले आहेत. स्वार्थासाठी आणि कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी पक्ष बदलणाऱ्यांची संख्या तर मोजूनही संपणार नाही. स्वार्थी राजकारण्यांबद्दल न बोलणंच योग्य...

पण अलीकडे आपल्यासारखा सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणूसही खूपच स्वार्थी आणि स्वयंकेंद्री होऊ लागलाय. टीव्हीवरच्या लांबलचक मालिका बघून आपल्या मध्यमवर्गीय समाजाच्यादेखील सुखाच्या संकल्पना झपाट्याने बदलत चालल्या आहेत. त्याच्याकडे आहे ते माझ्याकडे असलंच पाहिजे. आणि मला जे मिळालं नाही ते इतर कुणालाही मिळता कामा नये असा विकृत दृष्टिकोन झपाट्याने फोफावतोय ही चिंतेची बाब आहे. टीव्हीवरच्या मालिकांतून जी कपट-कारस्थानं, कुरघोड्या आणि कुचाळक्या आपण पाहतोय ते सगळे दुर्गुण आपल्या स्वभावात भिनू लागले आहेत.

आपण केवळ मी आणि माझं एवढाच संकुचित विचार करायला लागलो आहोत...

कुठंतरी चुकतंय...

यावर उपाय... यावर उपाय एकच...

आपल्याकडे एक प्रार्थना आहे.

सर्वेपि सुखिन सन्तु।
सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु।
मा कश्चित दुःखमाप्नुयात।।

भावार्थ : सर्वजण सुखी होवोत. सर्वजण निरामय (आरोग्यसंपन्न होवोत) सर्वांच्या डोळ्यांना शुभच दिसू देत म्हणजेच सर्वांच्या आजूबाजूला केवळ मांगल्याचं वातावरण असू देत. सर्वांचं कल्याण होवो आणि कुणीही दुःखी नसू दे.

प्रत्येकानेच ही प्रार्थना काही अंगी जरी अमलात आणण्याची आवश्यकता आहे. सर्वांनीच जर स्वतःच्या वृत्तीत थोडा बदल केला आणि 'आपल्यासोबत इतरांनाही सुखी होण्याचा तितकाच हक्क आहे.' हे मान्य करून परस्परांशी वैरभाव न धरता थोडं मित्रत्वानं सहकार्य केलं तर...

'जर आणि तर'चा विचार न करून काहीही होणार नाही.

चला तर... इतरांनी चांगलं वागावं ही अपेक्षा न बाळगता आपण स्वतःपासूनच सुरुवात करूया...

स्वतःबरोबरच आसपासचं जगही सुंदर करूया...

# भगीरथाने केला पितरांचा उद्धार



महाभारतातील मोतीकण

**भालचंद्र ठोंबरे**

ब्रह्मा, विष्णू, महेश यापैकी ब्रह्मदेव हे विष्णूच्या नाभीतून उत्पन्न झाले. ब्रह्मदेवाच्या अनेक मानस पुत्रांपैकी दक्ष प्रजापती एक होते. दक्षाच्या अनेक कन्यांपैकी १७ कन्या ऋषी कश्यपांना दिल्या. त्यापैकी एक कन्या अदितीपासून विवस्वानासह बारा पूत्र झाले. विवस्वानापासून मनूचा जन्म झाला. एकदा मनूला शिंक आली. त्यामुळे एक पुत्र उत्पन्न झाला, तो ईश्वांकू. ईश्वांकूच्या कुळातच पुढे प्रभू श्रीरामांचा जन्म झाला.

ईश्वांकूच्या कुळात बाहूक नावाचा राजा झाला. बाहुकाचा त्याच्या शत्रूंनी पराभव केल्यामुळे तो पत्नीसह अरण्यात गेला. त्या वेळेला त्याची पत्नी करुणावती गर्भवती होती. वनात राजा मरण पावला. तेव्हा करुणामाईने सती जाण्याचा निर्णय घेतला; परंतु त्रिकालज्ञानी महर्षी और्व मूनींना करुणावती गर्भवती असल्याचे अंतर्ज्ञानाने कळले. त्यामुळे त्यांनी तिला सती जाण्यापासून परावृत्त केले. करुणावती गर्भवती आहे, हे पाहून तिच्या ११ सवतींना मत्सर निर्माण झाला. त्यांनी करुणावतीला जेवणातून विष दिले; परंतु महर्षी और्व यांना हे अंतर्ज्ञानाने कळल्यावर त्यांनी आपल्या तपोबलाने त्याचे रक्षण केले. तो पुत्र म्हणजे सागर. सागर मोठा झाल्यानंतर त्याने सैन्याची जमवा जमव करून आपले राज्य परत मिळवले. सागरला दोन राण्या होत्या. सुमती व दुसरी केशीनी. केशनीला असंमज नामक एक पुत्र, तर सुमितीला साठ हजार पुत्र होते. केशनीचा पुत्र असमंजस. तो दुराचारी होता. त्याला अंशुमान नावाचा पुत्र होता.

एकदा सागरने अश्वमेघ यज्ञ केला. त्या यज्ञाचा घोडा इंद्राने पळवून कपिल मुनींच्या आश्रमात सोडला. घोड्याच्या शोधात गेलेल्या सागरच्या साठ हजार पुत्रांना हा घोडा कपिल मुनींच्या आश्रमात दिसल्यामुळे कपिल ऋषींनी त्या घोड्याला पकडून आणले असावे या विचाराने ते सर्वजण कपिल मुनींवर धावून गेले. कपिल मुनींनी त्या सर्वांना भस्म केले. बऱ्याच वेळेपर्यंत पुत्र आले नाही हे पाहून सागर राजाने अंशुमानला आपल्या चुलत्यांना शोधायला पाठविले. शोधता शोधता तो कपिल मुनींच्या आश्रमात पोहोचला. आश्रमात उभा असलेला घोडा पाहून त्याने मुनींना आदरपूर्वक नमन करून त्यांची स्तुती केली. त्या स्तुतीने प्रसन्न होऊन कपिल मुनींने त्याला घोडा घेऊन जाण्यास सांगितले. त्याच ठिकाणी असलेले राखेचे ढीग पाहून अंशुमाने त्यांना विचारले, असता ही तुझ्या चुलत्यांची राख असल्याचे कपिल मुनींनी त्याला सांगितले. या मरण पावलेल्या तुझ्या चुलत्यांचा उद्धार तुझा नातू करेल, असा अंशुमानाला आशीर्वाद दिला. अंशुमान घोडा घेऊन निघून गेला व सागराने यज्ञ पूर्ण केला.

कपिल ऋषींच्या सांगण्यावरून आपल्या पितरांना मुक्ती देण्यासाठी अंशुमान त्याचा मुलगा दिलीप यांनी बरेच श्रम व तप केले मात्र त्यांना यश मिळाले नाही. दिलीपचा पुत्र भगीरथाने यासाठीच अनेक वर्ष गंगेची प्रार्थना केली. गंगा ब्रह्म लोकात होती. तसेच तिच्या स्वतःच्या इच्छेशिवाय तिला स्वर्गातून ब्रह्मदेव काढू शकत नव्हते. भगीरथाने गंगेला पृथ्वीवर येण्याची विनंती केली, भगीरथाचा उदात्त हेतू पाहून गंगेने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. मात्र ब्रह्मलोकांतून पृथ्वीवर येताना तिचा वेग प्रचंड असल्यामुळे त्या वेगाला काबूत ठेवू शकेल, असा आधार शोधणे आवश्यक आहे. अन्यथा हा वेग पृथ्वीला फाडून मी(गंगा) रसातळाला जाईन. तसेच मी(गंगा) पृथ्वीवर आल्यास लोक आपली पापे त्यात धुतील मग मी ती पापे कोठे धुणार? अशी भगीरथाला विचारणा केली.

तेव्हा भगीरथाने सांगितले सदगुरू, संन्याशी व ब्रह्मनिष्ठ अशा लोकांमध्ये स्वतः भगवानच वास करीत असतात, ते तुझ्यात स्नान करतील. त्यांच्या अंग स्पर्शाने तुझी पापे नष्ट होतील. अशा प्रकारे भगीरथाने समर्थन करता, गंगेने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. तेव्हा भगीरथाने पुन्हा ब्रह्मदेवाची आराधना करून त्यांच्याकडून गंगेला पृथ्वीवर नेण्यासाठी परवानगी मिळवली. तसेच गंगेच्या आधारासाठी महादेवाकडेच विनंती करावी, अशी ब्रह्मदेवांनीच भगीरथाला सूचना केली. त्याप्रमाणे भगीरथाने महादेवाची आराधना केली व महादेवांना गंगेला धारण करण्याची विनंती केली. महादेवाने भगीरथाची विनंती मान्य केली. भगीरथाने गंगेला विनंती करताच गंगा स्वर्गातून पृथ्वीवर येण्यासाठी प्रचंड वेगाने निघाली. महादेवाने गंगेला आपल्या जटेत बद्ध करून तिच्या वेगावर नियंत्रण केले व आपली एक जटा मोकळी करून तिला त्यातून मुक्त केले. तसेच भगीरथाला पुढील प्रवासासाठी एक रथ दिला. गंगेने भगीरथाला आता तू पुढे चल तुझ्या मागे मी येते, असे म्हणून भगीरथाच्या मागे जाऊ लागली. मार्गात एका ठिकाणी महर्षी जनहू आश्रम होता. गंगेच्या प्रवाहाने आश्रमातील यज्ञाचे अनुष्ठान वाहून गेले. ते पाहून ऋषी जनहूंनी गंगेला पिऊन टाकले. तेव्हा भगीरथाने सर्व वृत्तांत कथन करून महर्षी जनहू गंगेला मुक्त करण्याची विनंती केली. भगीरथाचा उदात्त हेतू पाहून महर्षी जनहू यांनी गंगेला आपल्या कानातून मुक्त केले. त्यामुळे गंगेला जान्हवी सुद्धा म्हटले जाते. भगीरथाने गंगेला आपल्या पितरांच्या राखेच्या ढिगाऱ्यापाशी आणताच व गंगेचा स्पर्श होताच भगीरथाच्या पितरांचा उद्धार होऊन ते स्वर्गाला गेले. श्रीमद् भागवतानुसार गंगाजलाने ज्यांच्या शरीराच्या राखेलाही स्पर्श केला त्यांना स्वर्गाची प्राप्ती झाली, तर जे लोक श्रद्धेने नियमपूर्वक गंगा स्नान करतात. त्यांच्या भाग्यासंबंधी काय सांगावे?

भगीरथाने महत्त प्रयासाने गंगेला पृथ्वीवर आणल्यामुळे गंगेला भागीरथी असेही म्हटले जाते, तर महर्षी जनहू यांनी तिला कानातून मुक्त केले म्हणून तिला जान्हवी या नावानेही ओळखले जाते. तर एखाद्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांना भगीरथ प्रयत्न असे म्हणण्याचा प्रघात आहे.

# एसपी दारात उभे ;अन् पोलीस आतमध्ये गांजा ओढण्यात मग्न

बोंबला

## बीड पोलिसांची प्रतिमा मलिन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंदे आणि गैरकारभारावर निर्बंध आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले असताना दुसरीकडे त्यांच्याच खात्यातील कर्मचारी कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढ आहेत. अन्य कुठे नव्हे तर थेट पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानीच काल (दि. ४) रात्री ९ ते ९.३० च्या दरम्यान एका कर्मचाऱ्याला एसपींनीच गांजा पिताना रंगेहात पकडले. या प्रकारामुळे आता पोलीस दलाचीच प्रतिमा मलीन होत असून रोजच्या घटनांनी जिल्हयातील पोलीस दलाची बदनामी कमी होते की काय त्यात नव्याने भर पडली आहे.

शिवाजी नगर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार बाळू बहिरवाळ असे त्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. सध्या पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानच्या डागडुजीचे काम सुरु असल्याने पोलीस अधिक्षक सध्या गेस्ट हाऊसमध्ये मुक्कामी आहेत. काल रात्री ९ ते ९.३० च्या दरम्यान ते आपल्या कुटुंबासह घराचे काम पाहण्यासाठी गेले होते. यावेळी बाळू बहिरवळ हा दरवाजा लाऊन आता गांजा पित होता. पोलीस अधीक्षकांनी स्वतः खूप वेळ दरवाजा ठोठावून ही दार उघडत नसल्याने त्यांना शंका आली. काही वेळानंतर बाळूने दरवाजा उघडला तेंव्हा आता गांजाचा वास आला. पान २ वर





### पोलीस दलाची प्रतिमा

बीड जिल्ह्यात आल्यापासून पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी पोलीस दलाची प्रतिमा सुधारण्यासाठी मोठी मेहनत घेतली. अनेक निर्णय घेऊन पोलिसांची वेगळी प्रतिमा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. अजूनही ते अनेक समाजउपयोगी निर्णय घेऊन कायद्याची भीती निर्माण करत असताना दुसरीकडे काही मूठभर अधिकारी आणि कर्मचारी खाकीच्या प्रतिमेला डाग लावण्याचे काम करत आहेत.

## शॉर्टसर्किटमुळे लागली आग

दुर्घटना:नाकलगाव येथील शेतकऱ्यांचे झाले नुकसान



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिंद्रुड:माजलगाव तालुक्यातील नाखलगाव शिवारात शेतातील वखारीला व कडब्याच्या गंजीला आग लागल्याने दोन शेतकऱ्याचे शेतीचे साहित्य जळून २ लाख ६७ हजार सातशे रुपयाचे नुकसान झाल्याची घटना काल गुरुवार (१ मे) रोजी घडली. याप्रकरणी माजलगाव महसूल प्रशासनाला खबर देऊन तलाठी यांच्याकडून पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला आहे.

नाखलगाव येथील शेतकरी बळीराम दगडूबा लगस्कर व किसन दगडूबा लगस्कर यांच्या येथील शिवारात शेत गट क्र. ३७३ मध्ये असलेल्या वखारीला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने अंदाजे २५ हजार रुपये किंमतीचा एक हजार कडबा, ७० हजार रुपये किंमतीचे स्पिंकलरचे दोन सट, ६५ हजाराची सोलार पंप मोटर, अकरा हजार नऊशे चे २६० फूट मोटर वायर, ६ हजार रुपयाचे खताचे चार पोते, ९० हजाराचे वखारीसाठी केलेले पत्र्याचे शेड असा एकूण २ लाख ६७ हजार सातशे रुपयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे पंचानुमते सांगण्यात आले. संबंधित शेतकऱ्याचे वखार व कडब्याला लागलेल्या आगीमुळे मोठे नुकसान झाल्याने प्रशासनाने त्यांना मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. पान २ वर

## वैभवी देशमुखच्या डोळ्यातून अश्रू

वठवणी:वडील असते तर त्यांनी कौतुक केले असते

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे गेल्या वर्षी ९ डिसेंबर रोजी अपहरण करण्यात आले होते आणि छळ केल्यानंतर त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे राज्यभरात हाहाकार उडाला होता. तसेच देशमुख कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. याचदरम्यान, संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख हिने बारावीची परीक्षा दिली होती. मात्र, या कठीण परिस्थितीमध्येही वैभवी देशमुखने बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे.



**वैभवीला किती टक्के गुण? :** नुकतेच दुपारी एक वाजता बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. या परीक्षेत वैभवी देशमुखला ८५.३३ टक्के गुण मिळाले आहेत. वैभवीने बारावीची परीक्षा विज्ञान शाखेतून दिली होती. यामध्ये वैभवीला इंग्रजी विषयात ६३, मराठीत ८३, गणितामध्ये ९४, फिजिक्समध्ये ८३, केमेस्ट्रीत ९१ आणि बायोलॉजी विषयात ९८ गुण मिळाले आहेत. तिला एकूण ६०० पैकी ५१२ गुण मिळाले आहेत. वैभवीच्या या यशाने संपूर्ण बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा मिळाली आहे.

## बडेवाडीत अखंड हरिनाम सप्ताह

अध्यात्मिक:नामदेव महाराज शास्त्री यांचे कीर्तन

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिंद्रुड:माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला बुधवारी सुरूवात होत आहे.या निमित्त श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ. न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या आशीर्वचन कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी सायंकाळी करण्यात आले आहे.

बडेवाडी येथे मागील काही वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह तथा ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण,श्रीमद भागवत कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन वैशाख महिन्यात



करण्यात येते. या धार्मिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत ह.भ.प.डॉ. नामदेव पान २ वर

## माजलगावमध्ये श्रामणेर शिबिर

धम्मकार्य:भारतीय बौद्ध महासभेचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:भारतीय बौद्ध महासभा जि.बीड पूर्व अंतर्गत माजलगाव तालुका शाखेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन,सांची बुद्ध विहार,केसापूरी कॅम्प,माजलगाव येथे दहा दिवसीय बौद्धाचार्य-श्रामणेर शिबीर दिनांक ०३ मे २०२५ रोजी पूज्य भंते दीपरत्न यांच्या नेतृत्वात व आद डॉ.भागवत साळवे (ता.अध्यक्ष माजलगाव) यांच्या अध्यक्षतेखाली मंगलमय वातावरणात सुरू झाले.

या श्रामणेर शिबिरात २९ शिबिरार्थ्यांचा पूज्य भंते दीपरत्न यांच्या हस्ते पबज्जा विधी संपन्न झाला. या शिबिराचे उद्घाटन



जिल्हाध्यक्ष अड बाबासाहेब भगवानराव धन्वे यांच्या हस्ते मेणबत्ती प्रज्वलित करून करण्यात आले.

या प्रशिक्षण शिबिरासाठी आद. एस. बी. मोरे (उपाध्यक्ष संस्कार जि.बीड पूर्व) यांची पूर्णवेळ केंद्रीय शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

शिबीर उद्घाटन प्रसंगी, आद. कमलताई डोंगरे (जिल्हाध्यक्ष महिला बीड पूर्व),आद. लिलाताई उजगरे (उपाध्यक्ष संस्कार महिला), पान २ वर

## सचिन दहिफळेंचा यथोचित सन्मान

अभिनंदनिय:उत्कृष्ट कार्याबद्दल मंत्री पंकजा मुंडेंकडून दखल




पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतील ॲग्री फिल्ड ऑफीसर सचिन दहिफळे यांचा राष्ट्रीय पशूधन मिशन अंतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

येथील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतील ॲग्री फिल्ड ऑफीसर सचिन दहिफळे यांनी राष्ट्रीय पशूधन मिशन अंतर्गत शाखेत केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. पशू संवर्धन विभाग बीड यांच्या वतीने येथील गोपीनाथ मुंडे नटराज रंग मंदिरात राष्ट्रीय पशूधन अभियानांतर्गत एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पान २ वर

## पाटोद्यात वाहन पार्किंगचा प्रश्न

समस्या:नागरिकांची वाहन तळासाठी मागणी

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हजरत राज मोहम्मद चौक दरम्यानचा रस्ता हा शहरातील प्रमुख आणि नेहमीच गजबजलेला मार्ग आहे. मात्र, या रस्त्यावर दुचाकी आणि चारचाकी वाहने रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृतपणे पार्क केल्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. परिणामी अपघातांची शक्यता वाढली असून नागरिकांमध्ये याविषयी तीव्र नाराजी आहे.

या मार्गावर दुकाने, शाळा, कार्यालये आणि बाजारपेठ असल्यामुळे दिवसभर वाहतुकीची वर्दळ सुरू असते. मात्र रस्त्यावरच उभ्या असलेल्या वाहनांमुळे पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा मिळत नाही आणि वाहतुकीचा ओघही खोळंबतो. यामुळे अनेक किरकोळ अपघात घडले असून, भविष्यात मोठ्या दुर्घटनांची शक्यता नाकारता येत नाही.



या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांनी पाटोदा नगरपंचायतीकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. शहराच्या मध्यवर्ती किंवा उपनगरात योग्य जागा निवडून कायमस्वरूपी वाहनतळ उभारण्यात पान २ वर

## बांधकाम कामगारांनी लाभ घ्यावा

शफिक भाऊ:माजलगावमध्ये होणार कॅम्प

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,बीड चे अधिकारी श्री मुंडे सारांच्या वतीने पूर्ण बीड जिल्ह्यात जीवित नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी वस्तू अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) या योजनेचा कॅम्प घेऊन लाभ देण्यात येत आहे.

यामध्ये माजलगाव येथे श्री मुंडे सर यांच्याच मार्गदर्शना खाली दिनांक ६ मे रोजी सकाळी ठीक १०:०० वाजल्यापासून जीवित नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी वस्तू अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) चा कॅम्प घेण्यात येणार आहे. तरी या कॅम्पमध्ये माजलगाव तालुक्यातील संपूर्ण जीवित नोंदणी कृत बांधकाम कामगार लाभार्थीने या योजनेचा लाभ घ्यावा व कोणीही बांधकाम कामगार या योजनेतून वंचित राहूनय म्हणून बांधकाम मजूर संघटनाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख हमीद (शफिक भाऊ) यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे असे आव्हान केले.

पप्पू कागदे

## मोरगाव येथे रिपाइंची शाखा स्थापन

# ...तरच आपले प्रश्न सुटतील

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भसरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपाब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांची नाळ आंबेडकरी चळवळीशी जोडलेली असून रिपाइं कार्यकर्त्यांनी चळवळीशी व आंबेडकरी विचारांशी एकनिष्ठ राहून अनेक आंदोलने केली आहेत. कसलाही राजकिय वारसा नसतांना समाज बांधवावरीत अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सामाजिक न्याय केंद्रिय मंत्री रामदास आठवले देश पातळीवर करीत आहेत. आगामी काळात आंबेडकरी युवकांनी एकत्रित येवून रिपाइंच्या माध्यमातून एकजूट दाखविल्याशिवाय प्रश्न सुटणार नाहीत, आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या समाज बांधवांसमोर



अनेक प्रश्न उभा आहेत. आपली ताकद एकजुटीने दाखविली तरच शासनाला आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यास भाग पाडू शकतो, त्यामुळे रिपाइं कार्यकर्त्यांनी कुठल्याही अभिषाला बढ़ी न पडता सर्व ताकदीनिशी एकत्र यावे. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मोरगांव येथील रिपाइं शाखा नामफलकांच्या उदघाटना प्रसंगी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, आंबेडकरी चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी युवकांचे संघटन व ताकद महत्वाची आहे. युवकांनी रिपाइंच्या माध्यमातून पान २ वर

### शाखा कार्यकारीणीत निवड

मोरगाव येथील रिपाइं शाखा स्थापनेत अध्यक्ष म्हणून शाम जाधव, उपाध्यक्ष- रणजीत गोरे,सचिव चंद्रकांत थोरात, सल्लागार-सतिष थोरात यांची निवड करण्यात आली आहे.

## ..नसता गावकरी जलसमाधी घेणार

ॲड.बळीराम पानसरे:साथरा-पोत्रा ग्रामस्थ आक्रमक



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:येथील आंबील वडगाव कुंभारी तालुका जिल्हा बीड येथे साथरा-पोत्रा साठवन तलाव असून मागील एक वर्षापासून हा तलाव अज्ञात व्यक्तीने सांडवा फोडल्यामुळे त्यामधून लाखो लिटर पाणी वाया जात आहे.जिल्हा प्रशासनाला वेळोवेळी लेखी तोंडी कळवून सुद्धा प्रशासनाने अद्याप पर्यंत या सांडव्याबाबत दखल घेतलेली नाही म्हणून या भागातील नागरिकांनी दिनांक १० मे २०२५ रोजी सातारा पोतरा साठवण पान २ वर